जगप्रसिद्ध नामांकित ब्रॅण्डचे दर्जेदार होम अप्लायन्सेस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन • एलईडी टीव्ही • होमथिएटर • मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
HDB FINANCIAL SERVICES · BAJAJ FINSERV · PHILIPS · INTEX · Whirlpool · SONY · SAMSUNG · Godrej · BLUE STAR · TCL · Haier

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

तुम्हाला तुमच्या बिजनेस व इंडस्ट्रीमध्ये खुप समस्या येत आहेत का? तुमची इंडस्ट्री व बिजनेस प्रॉफिटमध्ये नाही का?
तर आता काळजी करू नका...
तुमच्या इंडस्ट्री, बिजनेसमध्ये कोणताही प्रकारची तोडफोड न करता सायंटिफिक पद्धतीने एनर्जी बॅलन्स करून येत असलेल्या समस्येतून मुक्त व्हा आणि ते पण खात्रीशीर.
या पॉजिटिव्ह ट्रान्सफॉर्मेशनचा अनुभव घेण्यासाठी आमच्याशी संपर्क साधा
भूमाता ॲडव्हान्स वास्तू । रिसर्च सेंटर
सोनानगर चौक, कुष्टधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर
भगिरथ भारद्वाज मो. 9529818737 / 0241-3599263
इंडस्ट्री, बिजनेस व कमर्शियल प्रोजेक्ट वास्तू एक्सपर्ट वेळ स.११ ते रा.८ कृपया अपॉइंटमेंट घेणे आवश्यक

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. २५.०६.२०२५ | अंक नं. ७४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी · खरेदीवर पॉईंट · पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226 · अ. नगर (0241) 2999299 · नारायणगाव (02132) 242132 · श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर स्क्रॅचकार्डव्दारे जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर + 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# दिंडीतील वारकऱ्याचा नगरजवळ मृत्यू

## नगर- सोलापूर महामार्गावर दहीगावजवळ झाला अपघातात; रस्ता ओलांडताना भरधाव दुचाकीने दिली धडक

नगर - नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून नगरमार्गे पंढरपूरकडे चाललेल्या संत निवृत्तीमहाराज पालखी व दिंडीमधील वारकऱ्याचा भरधाव वेगातील दुचाकीने दिलेल्या धडकेत गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना नगर-सोलापूर महामार्गावर दहीगाव (ता.नगर) परिसरात २४ जून रोजी रात्री ८.३० ते ८.४५ च्या सुमारास घडली.

दत्तू किसन उगले (वय ६५, रा. लोखंडेवाडी, ता.दिंडोरी, जि. नाशिक) असे या मयत वारकऱ्याचे नाव आहे. मयत दत्तू उगले हे त्यांच्या पत्नीसोबत या दिंडीत आलेले होते. दिंडीने नगर शहरातील मार्केट यार्ड परिसरात मुक्काम केल्यानंतर ती २४ जून रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली होती. रात्री या दिंडीचा मुक्काम साकत या गावात होता. दिंडीतील सर्व वारकऱ्यांनी रात्री जेवण केल्यावर उगले पती पत्नी हे दहीगाव येथे परिचित व्यक्तीच्या घरी मुक्कामासाठी पायी चालले होते. दहीगावच्या राम मंदिरासमोर महामार्ग ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या दुचाकीस्वाराने उगले यांना जोराची धडक दिली. त्यामुळे ते रस्त्यावर पडले. त्यांच्या डोक्याला मार लागल्याने मोठा रक्तस्राव झाला. अपघाताची माहिती मिळताच दिंडीतील व्यवस्थापक साहिल मुथाळ तसेच ह.भ.प. चेतन महाराज नागरे यांच्यासह परिसरातील नागरिकांनी रुग्णवाहिका बोलावून त्यांना तातडीने उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले. मयत वारकरी उगले हे गेल्या अनेक वर्षांपासून संत निवृत्तीनाथ महाराज यांच्या दिंडीत सहभागी होत होते. या दुःखद घटनेमुळे दिंडीतील सर्व वारकऱ्यांमध्ये शोककळा पसरली असून, अशी दुर्घटना पुन्हा कोणत्याही वारकऱ्याच्या बाबतीत घडू नये यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे चेतन महाराज नागरे यांनी सांगितले.

दरम्यान या अपघाताची माहिती मिळताच पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असलेले नगर तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते हे तातडीने घटनास्थळी गेले. त्यांनी व पथकाने अपघात करणाऱ्या दुचाकीस्वाराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला मात्र सदर दुचाकीस्वार हा अपघात झाल्यावर तेथून लगेच पसार झाला होता.

या प्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून मयताच्या नातेवाईकांच्या फिर्यादीनंतर अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# दिंडीतील वारकऱ्यांच्या तंबूजवळ संशयितरित्या फिरणाऱ्यास पकडले

नगर - पंढरपूरकडे आषाढी वारीसाठी दिंडीत चाललेल्या वारकऱ्यांच्या मुक्कामासाठी उभारण्यात आलेल्या तंबू जवळ रात्रीच्या वेळी चोरी करण्याच्या उद्देशाने संशयितरित्या वावरणाऱ्या एकास नगर तालुका पोलिसांच्या पथकाने पकडले आहे. ही कारवाई नगर तालुक्यातील रुईछत्तीसी गावात जनता विद्यालयाच्या मोकळ्या पटांगणात लावलेल्या तंबूच्या मागे २४ जून रोजी रात्री केली.

नगर तालुका पोलीस रात्री पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना रुईछत्तीसी गावातील जनता विद्यालयाच्या मोकळ्या मैदानात दिंडीतील वारकऱ्यांनी रात्री मुक्कामासाठी लावलेल्या तंबूच्या मागे अंधारात दबा धरुन संशयितरित्या बसलेल्या प्रशांत रजनीकांत भोसले (वय ३०, रा, तांबे मळा, व्हीआरडीई पाठीमागे बुरूडगाव रोड, ता.नगर) यास पकडले. त्याच्याकडे इतक्या रात्री इकडे काय करतोस अशी चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. त्याच्या विरुद्ध पोलीस अंमलदार आबासाहेब झावरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रल्हाद गिते, पोलीस अंमलदार आबासाहेब झावरे, वांढेकर, शिवाजी खरात यांच्या पथकाने केली.

CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
1 किलो I 500 ग्रॅम I 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाउस, आडते बाजार, अहमदनगर.
(0241) 2343896/2341196

# उपनगरी भागात महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने ओरबाडण्याचे सत्र सुरु

## बालिकाश्रम रस्त्यापाठोपाठ मिस्कीननगर येथेही झाली चेन स्नॅचिंग

नगर - सावेडी उपनगरात महिलांच्या गळ्यातील दागिने ओरबाडण्याचे सत्र पुन्हा सुरु झाले असून बालिकाश्रम रस्त्यावरील चेन स्नॅचिंग घटना ताजी असताना मिस्कीननगर येथेही महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन अनोळखी मोटारसायकल स्वाराने पळविल्याचे समोर आले आहे.

रात्री जेवण झाल्यावर घरासमोरील गल्लीत पायी फेरफटका मारत असलेल्या ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील ९ ग्रॅम वजनाची ५४ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन अनोळखी मोटारसायकल स्वाराने बळजबरीने, हिसकावून तोडून नेल्याची घटना २३ जून रोजी रात्री १०.४५ वाजता घडली आहे.

याबाबत रेखा अशोककुमार पावा (वय ७४, रा.आशा हाऊसिंग सोसायटी, मिस्किननगर, कृपाल आश्रम जवळ, सावेडी) यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या दररोज रात्री जेवण झाल्यावर शेजारी राहणाऱ्या मुलीसोबत घरासमोरील गल्लीमध्ये फेरफटका मारण्यासाठी जातात. २३ जून रोजी रात्री सुमारे १०.४५ वाजता त्या त्यांच्या घरासमोर मिस्कीन नगरमधील गल्लीमध्ये फेरफटका मारत असताना त्यांच्या पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या मोटारसायकल वरील अनोळखी इसमाने त्यांच्या गळ्यातील सुमारे ९ ग्रॅम वजनाची, ५४ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन हिसकावून घेतली आणि तो गंगा उद्यानमार्गे तारकपूरच्या दिशेने पसार झाला.

फिर्यादी यांनी पाहिले की चोरट्याने काळ्या रंगाचे जॅकेट परिधान केले होते, तसेच डोक्यावर हेल्मेट व पाठीवर बॅग होती.असे तक्रारीत म्हटले आहे. या प्रकरणी रेखा पावा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अनोळखी मोटारसायकल स्वाराविरुद्ध बी एन एस कलम ३०९(४) प्रमाणे जबरी चोरीच्या गुन्ह्यांची नोंद केली आहे.

### या चोरट्यांचा पोलिस कधी बंदोबस्त करणार

या वाढत्या घटनांमुळे सावेडी उपनगरातील महिलावर्गात चेन स्नॅचिंग करणाऱ्या चोरट्यांची चांगलीच दहशत पसरली असून सायंकाळच्या वेळी महिलांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले आहे. विशेषत: महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने ओरबाडण्याच्या लागोपाठ दोन घटना घडल्याने या चोरट्यांनी पोलिसांनाच आव्हान दिले आहे. जिल्हा पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांकडून सर्वत्र धाडसत्र सुरु आहे. मात्र चोऱ्या, घरफोड्या, चेन स्नॅचिंग करणाऱ्या या चोरट्यांचा बंदोबस्त कधी करणार असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

SONI TILES AND MARBLE INDUSTRIES Since 1965
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

वाढदिवस आपला आमच्या मनात लिहीला आहे प्रत्येक दिन आपणास शुभेच्छा देत आहोत...
२६ जुन
कामगारांचे नेते पै.सुनिलभाऊ कदम
(महाराष्ट्र कामगार केसरी)
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
लक्ष्मण तुकाराम कुलट (कुलट मामा)
आनंदऋषीजी हॉस्पिटल व कुलट परिवार

BRANDED
जीन्स व फॉरमल पॅन्ट
₹ 500 ला एक
₹ 900 ला दोन
₹ 1200 ला तीन
*मर्यादित स्टॉक
भरपूर व्हरायटीज्
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११९८
Terms & Conditions Apply.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल ॲण्ड मेडिकल रिसर्च सेंटर
दंतरोग मोफत तपासणी शिबीर
शुक्रवार - दि. २७-६-२०२५ * वेळ : सकाळी १० ते २
मेटलकॅप 1000/- · सिरॅमिक कॅप 1500/-, 2500/- · रुट कॅनल 2000/- ते 3000/- · दात साफ करणे (Scaling) 500/- पासुन पुढे.
दातांची कवळी बसवणे - (4 Types Denture) 8,000/-, 10,000/-,14,000/- 20,000/-
* औषध खर्च वेगळा
दातामध्ये सिमेंट भरणे 500/- पासुन पुढे.
इम्प्लांट 13500/- पासुन सुरु
• तज्ञ डॉक्टर • डॉ. अर्पणा पवार, डॉ. प्राची गांधी, डॉ. स्वराज ठोले (ओरल सर्जन)
नांव नोंदणी आवश्यक मो. नं. 9404472199
हायटेक पॅथोलॉजी लॅब व 35 अत्याधनिक डायलेसीस मशिनद्वारे सेवा उपलब्ध.
महावीर भवन - रुग्ण व रुग्णांचे नातेवाईक यांचे करिता अल्पदरात निवासाची व्यवस्था उपलब्ध. भोजन रु. 35/- मात्र
24 तास आपल्या सेवेत आनंदऋषीजी ब्लड बँक
डिजिटल एक्सरे रू. 250/- · सोनोग्राफी रू. 800/- · सिटीस्कॅन रू. 1250/- · एम.आर.आय. रू. 2500/-
१२४, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर - ४१४ ००१. फोन : ०२४१-२३२०४७३/७४/७५/७६
E-mail : admin@anandrishiji.com / anandrishiji@rediffmail.com / Website : anandrishijihospital.com


Follow Us On :
ग्रॅव्हिटी शॉवरने प्रत्येक बाथ बनेल अधिक स्पेशल...
आजच संपर्क करा!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# आमदारकी रद्द करून गोपीचंद पडळकर यांना अटक करावी

## लोकप्रतिनिधींच्या वक्तव्याबद्दल समाजामध्ये संतापाची लाट; विविध संघटनांच्या वतीने प्रांताधिकारी यांना निवेदन

संगमनेर – सांगली येथील घटनेला ख्रिस्ती धर्मगुरूंना जबाबदार धरून जो कोणी त्यांचा सैराट (जीवे मारणार) त्याला ११ लाखाचे बक्षीस देण्यात येईल असे वक्तव्य करणाऱ्या आमदार गोपीचंद पडळकर यांचा महाराष्ट्र अल्पसंख्यांक ख्रिस्ती विकास परिषद, वंचित बहुजन आघाडी, दलित पँथर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तसेच अल्पसंख्याक समाजाच्या वतीने निषेध व्यक्त करून प्रांताधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले.


आमदारकी रद्द करून गोपीचंद पडळकर यांना अटक करावी या मागणीचे निवेदन अल्पसंख्याक समाजाच्या वतीने प्रांताधिकारी अरुण उंडे यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले की, ख्रिस्ती समाज गेली काही वर्ष आपल्यावर होणारा अन्याय दूर व्हावा यासाठी शासन, लोकप्रतिनिधी व प्रशासनाकडे मागणी करत आहे. परंतु परिस्थितीत बदल होताना दिसून येत नाही उलट पक्षी त्यात वाढ होत आहे. त्यात काही लोकप्रतिनिधी उद्रेकी व चिथावणीखोर वक्तव्य जाहीर भाषणातून करीत आहेत. त्यामुळे समाजकंटक व्यक्तींना प्रोत्साहन मिळते. नुकताच हायकोर्टाचा एक निकाल सर्वोच्च न्यायालयाने रद्दबादल ठरवीत धर्मांतर म्हणजे नेमके काय हे स्पष्ट केले आहे. तसेच कोणालाही कोणाच्याही धार्मिक बाबींमध्ये अडथळा आणणे, धार्मिक स्थळात घुसणे, उपासनेस विरोध करणे निषिद्ध ठरविले आहे. लोकप्रतिनिधी गोपीचंद पडळकर यांच्या चिथावणीखोर वक्तव्यामुळे भविष्यात अन्याय आणि उद्रेकी कारवायांमध्ये जर अधिक गती आली तर नवल वाटायला नको. तरीही या लोकप्रतिनिधींच्या वक्तव्याबद्दल समाजामध्ये संतापाची लाट पसरली असून त्यांची आमदारकी रद्द करून त्यांना अटक करावी, अशी मागणी ख्रिस्ती विकास परिषदेचे अध्यक्ष अनिल भोसले, वंचित बहुजन आघाडीचे अजीज ओहरा, आरपीआयचे तालुकाध्यक्ष आशिष शेळके, शहराध्यक्ष कैलास कासार, प्रा.बाबा खरात, मुरताज बोहरी, राजाभाऊ इनामदार, प्रभाकर चांदेकर, प्रशांत यादव, विनोद गायकवाड, सोन्याबापु वाघमारे, मच्छिंद्र वाघमारे, सचिन मुंतोडे, भाऊसाहेब पवार, बी.के. गायकवाड, आसिफ शेख आदींनी केली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
"मुसाफिर"–९८२२०२०६९१



### गर्दी व चेंगराचेंगरीपासून वाचा...

१४० कोटींच्या 'महा'भारतात गर्दी हा अनिवार्य भाग बनलाय. रस्ते, मोर्चे, जत्रा, सार्वजनिक–राजकीय सभा, कार्यक्रम येथे गर्दीचा नेहमीच महापूर दिसतो.

नुकताच बेंगलोर क्रिकेट संघ जिंकला म्हणून झालेल्या चिन्नास्वामी स्टेडियममध्ये चेंगराचेंगरीत काही निरपराध जीवांचा बळी गेला तर मुंबईच्या रेल्वेच्या महागर्दीत काही निष्पापांना जीव गमवावा लागला.

चेंगराचेंगरीच्या या नियमित त्रासातून कसे वाचता येईल याचे सामान्य ज्ञान आता आपल्या सर्वांनाच ठेवावे लागेल. या चेंगराचेंगरीत अनेक लोक एकतर एकमेकांच्या अंगावर पडतात किंवा उभ्या उभ्या प्रचंड मोठ्या प्रमाणात एकाच दिशेस दाबले जातात. त्यामुळे शरीरावर पडणाऱ्या प्रचंड दाबामुळे, श्वसनक्रियेला अडथळा निर्माण होऊन श्वसनक्रिया बिघडते, बंद पडू शकते.

Tricks Professional Crowd Controller यांनी अशा चेंगराचेंगरीच्या वेळी वापरावयाच्या युक्त्या (सूचना) सांगितल्या आहेत.

१) चेंगराचेंगरीच्या गर्दीत अडकलात तर त्या गर्दीबरोबर तुम्हीही चालत राहा. वळण्याचा प्रयत्नही करू नका. २) हातातील पर्स, मोबाईल खाली पडला तरी ते उचलण्याचा प्रयत्न करू नका. तुम्ही वाकला, पडला तर मागच्या गर्दीखाली तुम्ही तुडवले जाऊ शकता. ३) गर्दीत चालतांना एखादे उंच ठिकाण दिसले तर तेथे चढा, पण बंद दार वा अडथळ्याच्या बाजूला उभे राहू नका. चेंगरून जाल. ४) बॉक्सर जसे आपले हात छातीसमोर ठेवतो त्या स्थितीत चाला म्हणजे छाती दाबली जाणार नाही. ५) एवढे करूनही खाली पडलात तर एका कुशीवर वळून, गुडघे पोटाशी घेऊन, दोन्ही हातांनी डोके पकडून fetal स्थितीत झोपा. त्यामुळे अंतर्गत अवयवांना दुखापत होण्याची शक्यता कमी होईल. ६) मन शांत ठेवा, आरडाओरड करून शक्ती वाया घालू नका.

तरीपण मला तर वैयक्तिरकित्या वाटते गर्दी टाळा, घातपात टाळा... बाकी ज्याची त्याची मर्जी...

# माळीवाड्यात दरोड्याच्या तयारीतील ३ जणांना पोलिसांनी पकडले; लोखंडी कटावणी, स्क्रू ड्रायव्हर, दोन छोट्या बॅटऱ्यासह साहित्य जप्त

नगर – दरोडा टाकण्याच्या उद्देशाने आवश्यक असलेले साहित्य, साधनासह पूर्वतयारी करुन दरोड्याच्या तयारीत असलेल्या ५ जणांच्या टोळीचा कोतवाली पोलिसांनी पाठलाग करुन तिघांना मुद्देमालासह शिताफिने पकडले. तर दोघे अंधाराचा फायदा घेवून पसार झाले. ही कारवाई माळीवाडा वेशी जवळ २५ जून रोजी पहाटे सव्वातीन वाजण्याच्या सुमारास करण्यात आली.

याबाबतची माहिती अशी की कोतवाली पोलीस शहर हद्दीत रात्र गस्त घालत असताना त्यांना माहिती मिळाली की माळीवाडा वेशीजवळ अंगात काळे कपडे घातलेले ५ इसम कोठेतरी चोरी करण्याच्या किंवा दरोडा टाकण्याच्या उद्देशाने अंधाराचा फायदा घेऊन थांबलेले दिसत आहे. अशी माहिती मिळाल्याने कोतवाली पोलिस तात्काळ वाडिया पार्क समोरील रोडवर गेले. त्यांना माळीवाडा वेशी जवळ ५ संशयित इसम दिसल्याने पोलिसांनी त्यांना चारी बाजूने घेराव करुन संशयीतांना पकडण्याचा प्रयत्न करीत असताना त्यांना पोलिसांची चाहूल लागल्याने ते पळू लागले. तेव्हा पोलिसांनी त्यांचा पाठलाग करुन तिघांना शिताफीने पकडले.

यावेळी अंधाराचा फायदा घेऊन दोघे पळून गेले ताब्यात घेतलेल्या तिघांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे गोलूसिंग नसीबसिंग पटवा उर्फ सिकलीगर (वय २२, रा. पाचोली, जिल्हा बुऱ्हाणपुर, मध्य प्रदेश), पातालसिंग दिलीपसिंग सिकलीगर (वय २०, रा. एकता नगर, नलवा रोड नंदुरबार), आकाश सिंग कैलास सिंग सिकलीगर (वय १९, रा. बीआरसी गेट, उदना प्रभुनगर, सुरत, गुजरात) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांच्याकडे पळून गेलेल्या दोघांबाबत चौकशी केली असता त्यांनी पळून गेलेल्या दोघांची नावे सांगण्यास टाळाटाळ केली व त्यांची नावे सांगितली नाही.

पोलिसांनी पकडलेल्या तिघांची झडती घेतली असता त्यांच्याकडे असलेल्या बॅगेमध्ये तीन मोठे स्क्रू ड्रायव्हर, लोखंडी कटावणी, दोन छोट्या बॅटऱ्या, एक लोखंडी नट खोलण्याचा पान्हा, कात्रीचे सिंगल भाग, दोन कानटोप्या असा दहा हजार दोनशे रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी मुद्देमाल जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार संभाजी कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गोलूसिंग पटवा, पातालसिंग सिकलीगर, आकाशसिंग शिकलीगर आणि फरार दोन इसम यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(४) (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख हे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचे मार्गदर्शन व सूचनेवरुन पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे, सहायक फौजदार संभाजी कोतकर, पोलीस हवालदार संदीप पितळे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल गाडे, अतुल काजळे यांनी केली आहे.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; ३७ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त


श्रीगोंद्यातील जुगार अड्ड्यावर छापा टाकून पकडलेल्या २४ जणांच्या समवेत पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी नेमलेल्या विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार.

नगर – श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव रोडवर सोनवणे वस्ती जवळ एका पत्र्याच्या शेडमध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी नेमलेल्या पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने छापा टाकत ३७ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करत २४ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

पोलिस उपअधीक्षक संतोष खाडे यांना श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव रोडवर सोनवणे वस्ती जवळ एका पत्र्याच्या शेडमध्ये मोठ्या प्रमाणात जुगार चालू असून त्या ठिकाणी लाखोंची उलाढाल सुरु असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार खाडे यांनी वेषांतर करून गांधी टोपी पंचा तसेच गावठी वेशभूषा करून पीक अप गाडीमध्ये उसाचे वाडे लावून ताडपत्रीने झाकून घेऊन जाऊन जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या छाप्यात २ लाख २२ हजारांची रोकड, ५ लाख ९६ हजार रुपये किंमतीचे २० मोबाईल, २८ लाख ९० हजार रुपये किंमतीची लहान मोठी ९ वाहने असा ३७ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून २४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शोभाचंद भंडारी यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – वडगाव गुप्ता येथील सुमन कॉलनीतील रहिवासी शोभाचंद रुपचंद भंडारी (देवळालीप्रवरावाला, वय ७७) यांचे २४ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, १ मुलगी, १ भाऊ, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दीपक व मनोज भंडारी यांचे ते वडील होत.



## श्रीमती प्रमिलाबाई लोढा यांचे संथाराव्रतात निर्वाण

नगर – गौरीघुमट येथील रहिवासी श्रीमती प्रमिलाबाई प्रेमसुख लोढा (वय ८०, हल्ली रा.बुरुडगाव रोड) यांचे २४ जून रोजी संथारा व्रतात निर्वाण झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्यामागे ४ मुली, १ मुलगा, सुन, नातवंडे, जावई असा परिवार आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. प्रेमसुख लोढा यांच्या त्या पत्नी, ओम प्रॉपर्टीचे संतोष लोढा यांच्या मातोश्री तर भाजपचे वसंत हस्तीमल लोढा यांच्या भावजय होत.

## मारुती पाखरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – देहरे येथील रहिवासी मारुती गणपत पाखरे (वय ७०) यांचे २३ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर देहरे अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रविंद्र पाखरे, संदीप पाखरे यांचे ते वडील होत.

# केडगाव औद्योगिक वसाहत परिसरातील खुनाचा झाला उलगडा

## पोलिसांनी तिघांना पकडले, लुटमारीसाठी खून केल्याचे आले समोर

नगर – केडगाव औद्योगिक वसाहत परिसरात २२ जून रोजी आढळलेल्या अनोळखी मृतदेहाच्या प्रकरणात पोलिसांनी तात्काळ तपास करून मयताची ओळख पटवत, तिघा संशयित आरोपींना अटक केली आहे. या हत्येचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अतिशय कौशल्याने करून खूनाचा गुन्हा उघडकीस आणला आहे. सदरचा खुन हा लुटमारीसाठी केल्याचे तपासात समोर आले आहे.


केडगाव औद्योगिक वसाहत परिसरात लुटमारीसाठी तरुणाचा खुन करणारे तिघे पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

केडगाव औद्योगिक वसाहत परिसरात नागछाप हिंग कंपनीजवळील मोकळ्या जागेत अनोळखी इसम रक्तबंबाळ अवस्थेत सापडला होता. गंभीर मारहाणीचे वळ व जखमा पाहता, प्राथमिकतः हा खून असल्याचा संशय पोलिसांना आला होता. त्यानंतर अनोळखी इसमाला उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात पाठवले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती.

मात्र, वैद्यकीय अहवाल व पंचनाम्यानंतर स्पष्ट झाले की सदर इसमाचा निर्घृण खून झाला आहे. त्यामुळे कोतवाली पोलीस ठाण्यात खून, पुरावा नष्ट करणे आदी कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची दखल घेत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांनी घटनास्थळी भेट देत तपासाची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेला दिली. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक तुषार धाकराव व त्यांच्या पथकातील अंमलदार शाहीद शेख, संदीप पवार, फुरकान शेख, विजय ठोंबरे, रवींद्र घुंगासे, मयुर गायकवाड, भगवान थोरात, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, मेघराज कोल्हे, भगवान धुळे यांनी घटनास्थळाजवळील २० ते २५ सीसीटीव्ही फुटेज तपासले.

तांत्रिक विश्लेषणाव्दारे तीन संशयितांची ओळख पटली. यामध्ये संदेश संजय क्षेत्रे (वय २५, रा. भुषणनगर), अमन असिरमिया शेख (वय २३, रा. शिवाजीनगर) व मंगेश कालीदत्त कांबळे (वय २१, रा. भुषणनगर) यांचा समावेश आहे. २४ जून रोजी सर्व संशयित आरोपींना केडगाव परिसरातून ताब्यात घेण्यात आले. संशयित आरोपी मंगेश कांबळे याच्याकडून मृत व्यक्तीचे आधार कार्ड सापडले. त्यावरून मृत इसमाची ओळख बोबडा अनारसिंग (रा. सुखपुरी, जैनाबाद, बुरहानपूर, मध्यप्रदेश) अशी असल्याचे समोर आले.

पोलीस तपासात संशयित आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या सांगण्यानुसार २२ जूनच्या मध्यरात्री संशयित आरोपी पुणे बसस्थानकाजवळून केडगावकडे जात असताना रस्त्यालगत उभ्या असलेल्या बोबडा अनारसिंग याला मोपेडवर जबरीने बसवून औद्योगिक परिसरात नेले. त्याला लुटण्यासाठी मारहाण करत त्याच्याजवळील बॅग, पैसे व एटीएम कार्ड हिसकावले. एटीएम पिन विचारून संदेश क्षेत्रेने पैसे काढण्याचा प्रयत्न केला, मात्र पिन चुकीचा असल्याने पैसे निघाले नाहीत. त्यामुळे संतापलेल्या संशयित आरोपींनी लाकडी काठी व दगडाने जबर मारहाण करत त्याचा खून केला असल्याचे समोर आले आहे.

## मधुकर सदलापूरकर यांचे अल्प आजाराने निधन



भिंगार – येथील मधुकर बाबू सदलापूरकर (वय ८०, रा.सरपणगल्ली, भिंगार) यांचे २४ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर भिंगार येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. राजू, संदीप व उमेश यांचे ते वडील होत.

## शहाजी सदाफुले यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी शहाजी रामभाऊ सदाफुले (वय ८०) यांचे २५ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

## सिताराम कळमकर यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील पाटबंधारे खात्यातील सेवानिवृत्त कर्मचारी सिताराम राणुजी कळमकर (वय ७०) यांचे अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, चुलत बंधू, दोन मुले, सुना, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. मुरलीधर, सुंदरबाळ व रावसाहेब कळमकर यांचे बंधू, अविनाश व अभिजीत कळमकर यांचे वडील, शरद, प्रकाश, रविंद्र, अच्युत, अक्षय व केशव कळमकर यांचे चुलते होत.

## कुसुमबाई गिते यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – बुऱ्हाणनगर येथील रहिवासी कुसुमबाई नंदकुमार गिते (वय ८०) यांचे २५ जून रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर बुऱ्हाणनगर स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गिते प्रिंटर्सचे दत्तात्रय, महेश, उमेश गिते यांच्या त्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

### जीएसटी व इन्कम टॅक्स भरण्याच्या नावाखाली सीएकडून

# हॉलमार्किंग व्यावसायिकाची १८ लाख ३१ हजारांची फसवणूक

## तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल

नगर – गंज बाजार येथील सोने–चांदीच्या दागिण्यांना हॉलमार्किंगचे व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकाची जीएसटी व इन्कम टॅक्स भरण्याच्या नावाखाली सीए कडून १८ लाख ३१ हजारांची फसवणूक करण्यात आल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी सीए सचिन आप्पासाहेब दुधाडे (रा.भिस्तबाग, तपोवन रोड), सीए देवेंद्र अण्णासाहेब पाटील (रा. यशोदानगर पाईपलाईन रोड) आणि सोनाली लोणकर या तिघांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत व्यावसायिक राजेश बाळासाहेब भोसले (रा. सारसनगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे गंज बाजारात सूर्या हॉलमार्किंग नावाची फर्म आहे. त्याद्वारे ते सराफ व्यावसायिकांचे सोन्या चांदीच्या दागिन्यांची गुणवत्ता तपासून हॉलमार्किंग करून देण्याचे काम करतात. त्यांच्या फर्मचे जीएसटी व इन्कम टॅक्सचे काम सीए सचिन आप्पासाहेब दुधाडे (रा.भिस्तबाग, तपोवन रोड), सीए देवेंद्र अण्णासाहेब पाटील (रा. यशोदानगर पाईपलाईन रोड) हे करत होते. त्यांनी फिर्यादी यांच्या कडून जीएसटी व इन्कम टॅक्स भरण्यासाठी वेळोवेळी १८ लाख ३१ हजार २९९ रुपये घेवून त्यातून जीएसटी व इन्कम टॅक्स न भरता त्या पैशांचा अपहार केला.

दरम्यान, जीएसटी व इन्कम टॅक्स रिटर्न नियमितपणे भरल्याचा बनावट अहवाल त्यांनी सादर केला. मात्र डिसेंबर २०२४ नंतर भोसले यांनी याबाबत चौकशी केली असता खात्यात कोणतीही जीएसटी भरणा न झाल्याचे समोर आले. संबंधित सर्टिफिकेटही खोटे असल्याचे जीएसटी कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे हॉलमार्किंग फर्मवर आता ३८ लाख रुपयांच्या दंडासह व्याजाची रक्कम भरावी लागणार आहे. या फसवणुकीत पुण्याची अर्णव एंटरप्राइजेस फर्म व त्यातील भागीदार सोनाली लोणकर हिचाही सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात भोसले यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ अंतर्गत कलम ३१६ (२), ३१८ (४), व ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

# रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या युवकास पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधाराचा गैरफायदा घेऊन काहीतरी गैरकृत्य करण्याच्या हेतूने स्वतःचे अस्तित्व लपवून संशयितरित्या वावरणाऱ्या तरुणास एमआयडीसी पोलिसांनीपकडले आहे. ही कारवाई नागापूर येथील सनफार्मा चौकाजवळ २४ जून रोजी पहाटे १वाजता केली.

एमआयडीसी पोलीस रात्री पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्री गस्त करीत असताना नागापूर येथील सनफार्मा चौकाजवळ, एका टपरीच्या आडोशाला अंधारात दबा धरुन संशयितरित्या बसलेल्या आकाश नवनाथ आंधळे (वय १९, रा. जिरेवाडी, ता. पाथर्डी) यास पकडले. त्याच्याकडे इतक्या रात्री इकडे काय करतोस अशी चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले असून त्याच्या विरुद्ध पो.कॉ. अनिल उगलमूगले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## घरासमोर लावलेल्या मोटारसायकलची चोरी

नगर – घरासमोर रस्त्याच्या कडेला हॅन्डेल लॉक करुन लावलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी झेड ९७००) अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना बोल्हेगाव येथील आंबेडकर चौकातील सोनचाफा कॉलनीमध्ये २१ जून रोजी रात्री १० ते २२ जून रोजी सकाळी ८ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात मनोज दीपक नरोडे (वय २३, रा. सोनचाफा कॉलनी, आंबेडकर चौक, बोल्हेगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अनोळखी चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जेवल्यानंतर पोट फुगत असेल तर

लठ्ठपणा ही एक मोठी समस्या आहे जी केवळ दिसायलाच वाईट नाही तर आपल्या आरोग्यावरही परिणाम करते. काही लोकांना लठ्ठपणाची नाही तर पोटाच्या चरबीची चिंता असते. सहसा पोट फुगण्याचे कारण पोटात तयार होणारा वायू असतो. ज्यामुळे पोटाचा आकार वाढू लागतो. याला पोटाची सूज असेही म्हणतात. पोट फुगलेले असेल, गॅस किंवा वेदना वाटत असतील, तर समजून घ्या की तुम्ही पोट फुगण्याचा त्रासाने ग्रस्त आहेत. पोट फुगणे टाळण्यासाठी, आहारात काही छोटे बदल करून आराम मिळवू शकता. जर तुम्हाला वारंवार पोट फुगण्याची तक्रार असेल, तर तुमच्या जेवणाच्या प्लेटमधून काही गोष्टी ताबडतोब काढून टाका. लसणामध्ये फ्रक्टन नावाचा घटक असतो. हा घटक पोटफुगीची समस्या वेगाने वाढवतो. त्यामुळे शक्य तितके कमी लसूण खाणे चांगले तसेच बीन्स पचनासाठी थोडे जड असतात. त्यामध्ये फायबरचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे पोटात जडपणा जाणवतो. त्यानंतर पोट फुगणे, पोटात सूज येणे आणि वेदना अशा तक्रारी येऊ शकतात. सफरचंदांमध्ये भरपूर फायबर असते. ज्यांचे पोट नाजूक आहे त्यांना गॅस किंवा पोटफुगीचा त्रास होऊ शकतो. असे असूनही, जर तुम्हाला सफरचंद खायचे असेल तर त्यांची साल काढून खाणे चांगले.

## पाककला

### उडीद दाळ वडे

**साहित्य :** १ वाटी उडीद डाळ, २ चमचे तांदळाचे पिठ, १ हिरवी मिरची, १ छोटा कांदा बारीक चिरून (ऑप्शनल), मीठ, हळद, धणे जीरे पूड पाव पाव चमचा, तेल, २ चमचे बारीक चिरलेली कोथिंबीर, भाजलेले २ टॉमेटो, मीठ, एक ओली लाल मिरची, एक लसूण, चाट मसाला, १ चिमुट साखर (ऑप्शनल)

**कृती :** प्रथम उडद डाळ पाच तास भिजत ठेवावे नंतर मिक्सरला पाणी न घालता वाटून वरील प्रमाणे मसाले, कांदा, मिरची, कोथिंबीर घालून तांदुळ पिठ घालून छान फेटून घ्यावे. पिठात जास्त हवा फेटून भरली तितके वडे जाळीदार नरम बनवू शकतो. आता एका कडाईमध्ये तेल गरम करून वडे तळून घ्यावेत. आता टॉमेटो गॅस वर भाजुन घ्यावे नंतर त्याच्या बिया काढून मिक्सरमध्ये टाकावे. त्यात लाल मिरची भाजुन, लसूण भाजुन, मीठ, चाट मसाला घालून क्रश करून ही चटणी गरामा गरम वड्या सोबत खायला द्यावी.

## वास्तू

❊ झाडू नेहमी उभा ठेवावा. झाडू आडवा ठेवल्यास दारिद्र्य येते.

❊ वापरलेले कपडे धुतल्याशिवाय कपाटात ठेवू नका. त्यामुळे नकारात्मक ऊर्जा वाढते.

❊ तिजोरी ईशान्य आग्नेय किंवा वायव्य भागात ठेवल्यास संपत्तीचा नाश होतो.

## सल्ला

सर्दी-खोकला झाल्यास १ मुठ फुटाणे आणि दोन लसणाच्या पाकळ्या खाव्यात.

## सौंदर्य

आवळा आणि ब्राह्मी पिढ्यान्‌पिढ्या वापरले जाणारे घटक केसांच्या मुळांना पोषण देतात आणि केसगळती रोखतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. २६ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, आर्द्रा ०८।४७, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : मुलांमुळे आनंद वाढेल. तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. नोकरीतहि समाधान वाढेल.

**वृषभ** : व्यवसायात अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते. आज तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता.

**मिथुन** : आज तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. तुम्ही उधार दिलेले पैसे तुम्हाला परत मिळतील. व्यवसायात परिश्रमपूर्वक काम कराल.

**कर्क** : तुम्हाला चांगला नफा आणि भरपूर यशही मिळेल. पशुपालनात गुंतलेल्या लोकांना यश मिळेल.

**सिंह** : कोणत्याही आजाराच्या भीती आणि गोंधळातून आराम मिळेल. तुमचे आरोग्य सुधारेल. तुम्हाला प्रचंड शारीरिक आणि मानसिक त्रासाला तोंड द्यावे लागेल.

**कन्या** : आजचा दिवस आनंदाचा आणि प्रगतीचा असेल. महत्त्वाच्या कामात कोणताही मोठा निर्णय तुमच्या वैयक्तिक परिस्थिती लक्षात घेऊनच घ्या.

**तूळ** : आज तुम्हाला तुमच्या आईकडून काही चांगली बातमी मिळेल. तुम्ही शत्रूला हरवण्यात यशस्वी व्हाल.

**वृश्चिक** : क्रीडा स्पर्धेत तुम्हाला यश मिळेल. व्यवसायाची परिस्थिती सुधारेल. व्यवसायात तुम्हाला नवीन भागीदार मिळतील.

**धनु** : जुन्या न्यायालयीन खटल्याचा निर्णय तुमच्या बाजूने येण्याची शक्यता आहे. आज कामाच्या ठिकाणी खूप धावपळ होईल. कामात अचानक अडथळे येऊ शकतात.


**मकर** : आज बँकेत जमा असलेली भांडवल वाढेल. शेतीशी संबंधित महत्त्वाचे काम सरकारी मदतीने पूर्ण होईल.

**कुंभ** : ज्यामुळे तुम्हाला चांगले पैसे मिळतील. कामाच्या ठिकाणी काही विरोधक किंवा शत्रूमुळे तुम्हाला मोठे आर्थिक यश मिळेल.

**मीन** : आज तुमची रखडलेली सर्व रक्कम मिळणार आहे. तुमच्यासाठी ही सर्वोच्च घटना असेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२०७ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२०६ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) बातमी; वृत्त; वार्ता; खबर ४) ज्वारी वगैरे पिकाचे वाळलेले ताट ज्याचा जनावरांचा खाद्य म्हणून उपयोग केला जातो ७) वित्त; पैसा ८) पृथ्वीच्या भोवतालचे हवेचे आवरण १०) अंघोळ करण्याची जागा ११) डोंगरी किल्ला १३) ज्याची शिकार करावयाची आहे तो प्राणी १७) केस काळे करण्याचे रसायन १९) झाकण असलेले भांडे २०) आपत्ती; बला; अरिष्ट २२) लाकूड साफ करण्याचे सुताराचे हत्यार २४) मासे पकडण्याची आकडा लावलेली काठी २५) देश सोडून पळून गेलेला २७) खडतर व्रत; बारा वर्षांचा काळ २८) उजळ रंगाचा; गौरवर्णीय २९) ज्याअर्थी

**उभे शब्द :-** १) धनवान; श्रीमंत; मालदार २) अपमान; पाणउतारा; मानखंडना ३) गव्हाचे कणीदार पीठ ४) फटीतून येणारा प्रकाशकिरण ५) भय; भीती ६) शर; तीर ९) या पिकापासून गोणपाट तयार होते १२) वर फेकलेली वस्तू वरच्यावर हातात धरणे १४) एक झाड; वटवृक्ष १५) उत्तरदायित्व; जिम्मेदारी १६) सुसंगत नसलेले १७) कपट; कारस्थान; कावा १८) क्रम; मालिका २१) समूह (जनावरांचा वगैरे) २३) पाण्याचा प्रवाह; जमिनीचा सारा; धान्याचा दर २६) धातूवर चढणारे कीट; जंग

# ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊ मुलांचे विश्व ❊ ❊ ❊ ❊ ❊ ❊

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जी माणसे पैशाला किंमत देतात त्यांच्या जीवनात चांगली माणसं कधीच टिकत नसतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कानातील मळ म्हणजे काय आहे? तो काढणे का गरजेचे आहे?

कानातील मळ हे कानात नैसर्गिकरित्या तयार होणारं एक संरक्षणात्मक पदार्थ आहे. ते धूळ, बॅक्टेरिया आणि कीटकांपासून कानाचे संरक्षण करतं. थोडक्यात मळ आवश्यक असतं, पण ते जास्त प्रमाणात साठल्यास समस्या निर्माण होतात.

काही संशोधनानुसार, जर मळ खूप वाढला असेल तर तो एका विशिष्ट मज्जासंस्थेवर दाब देतो. हीच मज्जा पोटाशी जोडलेली असल्यामुळे काही वेळा भूख अनावर होण्याची शक्यता असते. जास्त मळामुळे कान बंद होऊ शकतो, आवाज अस्पष्ट ऐकू येतो किंवा बहिरेपणा जाणवतो. कानात दाब जाणवल्यास डोकेदुखी, चक्कर येणे किंवा अस्वस्थता जाणवू शकते.

काही लहान मुलांमध्ये अन्न खाण्याचं नियंत्रण राहात नाही आणि मुळाशी कानातील मळ असू शकतो.

सुई, पिन किंवा कानात वाटीने मळ काढणं टाळावं. यामुळे कानाला इजा होऊ शकते. दर ६ ते १२ महिन्यांनी तज्ज्ञांकडून कान तपासून घ्यावेत. आवश्यक असल्यास ते योग्य प्रकारे मळ काढून देतील.

### सुदर्शन चक्र व गदा

पूर्वी त्रिपुरासुर नावाचा राक्षस होता. तो गंगा व सागर यांचा पुत्र. तो फार शक्तिमान होता. पण या शक्तीच्या जोरावर त्याने सर्व देव व मनुष्यलोक यास सळो की पळो करून सोडले होते. तेव्हा श्रीशंकरांनी त्याचा नाश करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी सर्व देव, तीर्थे, पंचभूते व दिव्यौषधी यांच्या शक्ती एकत्र करून सहस्रधारांचे एक चक्र बनवले. हेच सुदर्शनचक्र होय. याच्या साह्याने त्यांनी त्या राक्षसाचा नाश केला. सर्व जण त्यांना त्रिपुरारी म्हणून लागले. मग शंकरांनी ते चक्र आपल्या मस्तकावर धारण केले.

विष्णूचे शंकर हे आराध्य दैवत होय. दररोज पाताळातून एक हजार कमळे आणून त्यांनी ते शंकरांची पूजा करीत. एकदा विष्णूची परीक्षा पाहण्याच्या हेतूने शंकरांनी त्या हजारांपैकी एक कमळ लपवून ठेवले. विष्णूच्या नकळत ही गोष्ट त्यांनी केली. इकडे पूजेच्या वेळी एक कमळ कमी असल्याने आपला नियमभंग होणार या भीतीने विष्णू हळहळले. पूजा करताना मध्येच न उठण्याचा नियम असल्याने पुन्हा पाताळात जाऊन कमळ आणणे शक्य नव्हते. तेव्हा सुवर्णकमळाऐवजी आपला एक डोळा काढून म्हणजेच नेत्रकमळ वाहून पूजा पूर्ण करावी, असा त्याने विचार केला व त्याप्रमाणे आपला एक डोळा शंकराला अर्पण केला.

विष्णूची ती विलक्षण भक्ती पाहून महादेव प्रसन्न झाले व जी इच्छा असेल, ते माग म्हणाले. तेव्हा विष्णूने सुदर्शनचक्र प्राप्त व्हावे, अशी इच्छा व्यक्त केली. महादेवांनी मोठ्या आनंदाने ते चक्र विष्णूच्या स्वाधीन केले.

लवणासुर नावाच्या जुलमी राक्षसाला विष्णूने ठार केले. त्याचा पुत्र गद याने या गोष्टीचा सूड घेण्याचे ठरवले. त्याने शंकरांना प्रसन्न करून घेऊन असा वर मागितला, की विष्णूचा माझ्या हातून पराभव व्हावा, त्रिभुवनभाराचे शस्त्र ज्याच्याकडे असेल, त्याच्याचकडून फक्त माझा नाश व्हावा. मग त्याने विष्णूशी युद्ध पुकारले. विष्णू सुदर्शनचक्र गदावर सोडणार, एवढ्यात ब्रह्मदेवाने त्याला शंकरांनी दिलेल्या वराबद्दल सांगितले. मग विष्णूने एक लांब देठाचे कमळ तोडून त्यात त्रिभुवनातील शक्ती साठवली व त्याने गदाचा नाश केला. त्या शस्त्राचे त्याने गदा' असे नाव ठेवले व ते आपल्या हातात नेहमी वागवू लागले.

## जीवन का अमृत (भाग १)



ज्यादा श्रद्धालु और समर्पित होना चाहिए, ताकि आपकी आध्यात्मिक उन्नति का महान् उद्देश्य पूरा हो सके।

उन छोटे-छोटे विरोधों की परवाह नहीं करो, जो दूसरे लोग अपने संकीर्ण दृष्टिकोण और पवित्र शिक्षाओं को ठीक से न समझने के कारण करते हैं।

आपको प्रेमपूर्वक और निष्ठावान होकर उन्हें यह अनूठा सत्य समझाना होगा और फिर यह उन पर है कि वे इसकी कीमत और सुंदरता को पहचाने ।

नाम, सतनाम या पवित्र शब्द हर वस्तु में व्याप्त है। वह गरीब में है, अमीर में है और बेसहारों में भी। हम प्रभु के नाम में भाई-बहन हैं और विश्व-बंधुत्व की आज के जमाने में सख्त जरूरत है।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

सच्चा धर्म, इंसान में पहले से ही मौजूद ईश्वरत्व (प्रभु) का प्रकट होना है। सच्चा धर्म न तो रीति-रिवाजों में मिलेगा और न ही किसी वर्ग या जाति विशेष में। यह सदा रहने वाला जीवन है। यह बड़े जीवन (प्रभु) से आत्मा का मिलन है। यह पूजा स्थलों में बंद नहीं है, बल्कि सार्वभौमिक प्रेम में बसता है। प्रेम सेवा और बलिदान चाहता है। ऐसी कोई जगह नहीं, जहाँ प्रभु नहीं। आप उसे संगमरमर और पत्थरों से बने आलीशान मंदिरों में नहीं पाएँगे। आप उसे गरीबों-बेसहारों के आँसूओं में पाएँगे। सच्ची खुशी दूसरों को देने में है, खुद पाने में नहीं। हम परंपरावादी प्रभु की पूजा करने वाले न बनें। हम अपनी नैतिकता को इतना ऊँचा उठाएँ कि अपने अंतर में ही प्रभु को पा जाएँ। प्रभु हर जगह व्याप्त है, पर इंद्रियों के घाट से ऊपर उठकर ही उससे जुड़ा जा सकता ।

जिंदगी की किताब को पढ़ने की कोशिश करो, यानि अपने आपको पहचानो। हम ध्यान रखें कि हम धर्म को किसी वर्ग या जाति विशेष से न जोड़ें। हमें यह अनुभव करना होगा कि जो चीजें हम देखते हैं, वे नाशवान् हैं, पर जो चीजें हमें दिखती नहीं वे शाश्वत हैं और यही सभी धर्मों की आधारभूत एकता है ।

इंसान चाहे कुछ भी हो, उसे अवश्य ही सदाचार, आत्मसंयम और दिल की सफाई के लिए काम करना होगा। मन, वचन और कर्म से पवित्रता जरूरी है। सदाचारी जीवन रूहानियत को पाने की सीढ़ी है। लेकिन रूहानियत केवल सदाचारी जीवन नहीं है। यह बात हमेशा याद रखों।

हम हमेशा याद रखें कि हमारा लक्ष्य प्रभु है। और हम किसी ऐसी चीज से वास्ता न रखें, जो हमें प्रभु भुला दे। हम गुटों और पार्टियों से ऊपर रहें और उनमें उलझें नहीं। हमारी सारी जिंदगी प्रेम और नम्रता पर आधारित हो। अगर हमारी कोई आध्यात्मिक उन्नति हो तो हम अहंकार से बचें। अपने साथियों को तुच्छ समझने के बजाय,

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

मन द्वारा ही हम भगवान से जुड़ते हैं। दुनिया का और कोई साधन नहीं है जिस के द्वारा हम भगवान तक पहुंच सकें।

सारा संसार एक निश्चित गति से चल रहा है। धरती २९ किलोमीटर प्रति सेकेंड की गति से चल रही है। सौर मंडल के सभी ग्रह तथा उपग्रह अपनी अपनी निश्चित गति के अनुसार अपनी धुरी पर घूम रहे हैं। ऐसे ही सूर्य एवम आकाश गंगा भी एक निर्धारित गति से चल रही है। पांचों तत्व भी हर समय चलते रहते हैं। इनकी भी अलग अलग गति है। कोई भी ठोस वस्तु के सूक्ष्म अणु इलेक्ट्रान, न्युट्रान और प्रोटोन एक निर्धारित गति से घूमते रहते हैं। सूक्ष्म शक्तियां, विद्युत तथा चुम्बकीय शक्ति, रेडियो तरंगे, लेजर तरंगे और अनेकों बलशाली गैसें भिन्न भिन्न गति से हर समय और स्थूल सूक्ष्म चलती रहती हैं। आज तक जितनी भी खोजे हुई हैं उन के अनुसार प्रकाश की गति सब से तेज है। प्रकाश तीन लाख किलोमीटर प्रति सेकेंड की गति से चलता है।

### आज्ञा चक्र

यह माना गया है कि मन भी उसी तत्व से बना है जिस तत्व से सूर्य बना हुआ । इस हिसाब से मन की गति भी तीन लाख किलोमीटर प्रति सेकेंड होनी चाहिये। सूर्य से प्रकाश को धरती पर पहुंचने में आठ मिनिट लगते हैं। परंतु वास्तव में मन दारा हम एक सेकेंड से कम समय में सूर्य को देख लेते हैं। इस से भी अधिक मन एक सेकेंड से कम समय में ब्रह्मांड में कही भी आ जा सकता है। यह सिद्ध करता है कि मन की गति प्रकाश की गति से भी बहुत तेज है। वास्तव में इस ब्रह्मांड में एक सबसे सूक्ष्म तत्व है जिसे ईथर कहते हैं। यह तत्व सभी ग्रहों, आकाश गंगा, ब्लैक होल, सूक्ष्म लोक और परमधाम जहां परमात्मा रहते हैं, वहां तक व्यापक है। यह तत्व संकल्पों का सुचालक है। हमारा मन अर्थात जहां हमें विचार उठते हैं वहां पर ईथर तत्व है। हम जो भी संकल्प करते हैं वह ईथर में ही करते हैं, जिस कारण हमारे विचार ईथर के द्वारा सारे ब्रह्मांड में सोचते ही फैल जाते हैं। यही कारण है कि सोचते ही हम कहीं भी पहुंच जाते हैं। मन की गति कितनी है यह जानना बहुत जरूरी है। यह जानने से अनजाने में मन द्वारा किये जा रहे नुकसानों से बच सकेंगे तथा मन द्वारा सहज ही विश्व का कल्याण कर पायेंगे।

हमारे दिमाग में जहां मन है वहां ईथर तत्व है और हम जो भी विचार करते हैं, ईथर तत्व में ही करते हैं अर्थात ईथर में प्रसारित होते रहते हैं। ईथर पूरे ब्रह्मांड में समाया है और संकल्पों का सुचालक है। इसलिये सोचते ही विचार ईथर द्वारा कहीं भी पहुंच जाते हैं। यह माना गया है कि मन और सूर्य एक ही तत्व से बने हुये हैं। इस हिसाब से मन की गति ३ लाख किलोमीटर प्रति सेकेंड होनी चाहिये जो कि सूर्य प्रकाश की है। परंतु इसकी गति प्रकाश से भी तेज है। ट्राजिट लोक जहां परमात्मा का निवास है वह धरती से अधिकतम दूरी पर है

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**बायको :** तुम्ही काही खाणार आहात का?
**नवरा :** काय ऑप्शन आहेत
**बायको :** हो किंवा नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❊ कोणत्या देशाने भारताचा मोस्ट फेव्हरेट नेशन चा दर्जा रद्द केलाय?

\- स्वित्झर्लंड

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

संगीतखुर्ची, पझल्स गेम ठेवावेत. यातून मुलांना खूप आनंद मिळतो. वेगवेगळे संगीत लावून त्यांना डान्स करण्यास प्रोत्साहन द्यावे. सर्व मुलांना बरोबर घेऊन एखाद्या छोट्या सहलीचे नियोजन करता येऊ शकते. प्रत्येक पालकाने एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी, की वाढदिवस हा तुमच्या मुलाचा आहे, त्यामुळे त्याला केंद्रस्थानी ठेवून त्याला जे आवडेल ते त्या दिवशी करावे. तुमची आवड त्याच्यावर बळजबरीने लादू नये. लहान मुलांना त्यांच्या वयाचे मित्र आवडत असतात. मोठी अनोळखी माणसे बघून ती घाबरतात.

म्हणून वाढदिवस अगदीच साधा करावा. यातून उरलेले पैसे एखाद्या सामाजिक संस्थेला अथवा अनाथ आश्रमाला दान करावे. बाळ थोडे मोठे झाल्यानंतर बाळाला अनाथ आश्रमामध्ये न्यावे व तेथील मुलासोबत वाढदिवस साजरा करावा.

### आजी-आजोबांची साथ

अनाथ मुलांना आजच्या मंगलमय दिनी बालकाच्या हाताने वही, पुस्तक, पेन, फळे द्यावीत. तसेच तेथील मुलांना आपल्यातर्फे जेवू घालावे. या उपक्रमाने ज्याला गरज आहे त्याला अन्न व इतर सामग्री मिळेल. त्यामुळे त्यांचे शुभाशीर्वाद नक्कीच आपल्या बाळाला मिळतील. गरजवंतालाच मदत करावी. जे रोजच तुप-रोटीचे जेवण जेवतात अशासोबत वाढदिवस साजरा करण्यापेक्षा गरजवंतांसोबत करावा. यामुळे तुमच्या बाळालाही भावी आयुष्यात सामाजिक कार्य करण्याची जाणीव लहानपणापासूनच होईल व हे त्याच्या सर्वांगीण विकासासाठी चांगले आहे. वाढदिवसाच्या दिवशी इतर कामांना प्राधान्य न देता आपल्या मुला-मुलीसोबत सात जास्त आनंदाचे क्षण कसे वेचता येतील. यासाठी जरूर प्रयत्न करावा. बाळ जेव्हा मोठे हाईल, त्या वेळी लहानपणीच्या वाढदिवसाच्या आठवणी कायम त्याच्या स्मरणात राहतील त्याच्या आवडीचे छानसे करावे.

प्रतिभा परवा बाजारामध्ये छोट्या श्रेयासोबत भेटली होती. श्रेया रस्त्यावरच हातपाय झाडत जोरजोरात रडत चॉकलेटसाठी हट्ट धरुन बसली होती. प्रतिभा तिला तशा अवस्थेत ओढत होती. तेव्हा मी तिला म्हणाले, ''अगं प्रतिभा, तिला असे ओढण्यापेक्षा तिचं म्हणणं शांतपणे ऐकून तिला सम जावून सांग.'' तेव्हा ती म्हणाली ''काही नाही हो मॅडम, हिचे तिच्या आजी-आजोबांनी अति लाड केले आहेत.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



जैन कटारिया फाउंडेशन लेडीज विंगच्या वतीने भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

# ‘ऑल इंडिया जैन कटारिया फाउंडेशन लेडीज विंग’तर्फे भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात वृक्षारोपण

**स्वच्छता अभियान राबवून प्लास्टिक मुक्तीचा संदेश**

नगर – ऑल इंडिया जैन कटारिया फाउंडेशन लेडीज विंगच्या वतीने भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्क परिसरात वृक्षारोपण अभियान राबवण्यात आला. पर्यावरण रक्षण व हरित शहराचा संदेश देत महिलांनी पुढाकार घेऊन विविध प्रकारच्या झाडांची लागवड केली. तर परिसरात स्वच्छता अभियान राबवून पर्यावरणाला घातक ठरत असलेल्या प्लास्टिक मुक्तीचा संदेश दिला.

या उपक्रमाचा प्रारंभ फाउंडेशनच्या कार्यकारिणी संचालिका भारती रविंद्र कटारिया यांच्या हस्ते वृक्षारोपणाने करण्यात आला. यावेळी रत्ना कटारिया, केतकी कटारिया, कोमल कटारिया, अनुष्का कटारिया,पूनम कटारिया, अर्चना कटारिया, स्नेहल कटारिया, आरती कटारिया, साधना कटारिया, दिपाली कटारिया, गुलाबबाई कटारिया, श्रेया कटारिया आदी महिला सदस्या व पुरुष बांधव उपस्थित होते.

भारती कटारिया म्हणाल्या की, वृक्षारोपण हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या घराभोवती, सोसायटी, सार्वजनिक ठिकाणी झाडे लावली, तर संपूर्ण समाज हरित व प्रदूषणमुक्त होईल. महिलांनी पुढाकार घेऊन या सामाजिक चळवळीत हातभार लावण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे कटारिया म्हणाल्या की, प्रदूषण, तापमानवाढ, जलसंकट या संकटांचा मुकाबला करण्यासाठी वृक्षारोपण हे अत्यंत प्रभावी व सुलभ उपाय आहे. आज आपण झाडे लावतोय, ती उद्या आपल्या पुढील पिढ्यांचे रक्षण करतील. प्रत्येक स्त्रीने एका हरित माताची भूमिका स्वीकारून अशा उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. प्लास्टिकमुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे. आपल्या परिसराची जबाबदारी आपलीच आहे, म्हणूनच आजच्या स्वच्छता मोहिमेद्वारे आम्ही प्लास्टिकमुक्तीचा संदेश देण्यात आला. पर्यावरण वाचवण्यासाठी वृक्षारोपणासोबत स्वच्छता व प्लास्टीक मुक्ती आवश्यक असल्याचे ते म्हणाल्या. या उपक्रमातून महिला सदस्यांनी कर्तव्यभावना व पर्यावरणस्नेही जीवनशैलीचा आदर्श सर्वांपुढे ठेवला आहे. तर सर्व समाजातील महिलांना या चळवळीत सहभागी करुन घेण्याचा संकल्प उपस्थित महिलांनी व्यक्त केला.

## श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सवाच्या नियोजनासाठी नगरमध्ये ३० जूनला बैठक

नगर – संत परंपरेतील थोर संत, श्री संत सेना महाराज यांची पुण्यतिथी २० ऑगस्टला साजरी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यतिथी उत्सवाचे सविस्तर नियोजन करण्यासाठी बैठक ३० जूनला आयोजित करण्यात आली आहे.

ही बैठक सकाळी १०.३० वाजता, संत सेना महाराज सांस्कृतिक भवन, तपोवन रोड, अहिल्यानगर येथे होणार आहे. या बैठकीत उत्सवाचे विविध कार्यक्रम, आयोजन, व्यवस्थापन, खर्च आदी बाबींचा आढावा घेऊन कार्यभाग निश्चित केला जाणार आहे.

अहिल्यानगर शहर तसेच परिसरातील उपनगरांतील सर्व नाभिक समाज बांधवांनी या बैठकीस उपस्थित राहून आपला अमूल्य सहभाग द्यावा, असे आवाहन अहिल्यानगर शहर नाभिक समाज तसेच अहिल्यानगर नाभिक समाज ट्रस्ट यांच्यावतीने करण्यात आले आहे. उत्सवाची भव्यता वाढविण्यासाठी आणि समाजाच्या एकतेचे दर्शन घडवण्यासाठी सर्वांनीच नियोजन प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



अहिल्यानगर येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात पर्यावरण रक्षणाचा संदेश देत प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते वृक्षांची लागवड करण्यात आली.

# जिल्हा न्यायालयात न्यायाधीशांच्या हस्ते वृक्षारोपण, गार्डन कमिटी न्यायालयीन परिसर हिरवाईने फुलवणार

**न्यायाचे रक्षणाबरोबर निसर्गाचे रक्षण, ही देखील सामाजिक जबाबदारी : जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे**

नगर – अहिल्यानगर येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात पर्यावरण रक्षणाचा संदेश देत प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांच्या हस्ते वृक्षांची लागवड करण्यात आली. जिल्हा न्यायालयाच्या गार्डन कमिटीच्या वतीने वृक्षारोपण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला न्यायालयीन अधिकारी, विधिज्ञ आणि कर्मचारी वर्गाचा उत्तम प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव कृष्णा सोनवणे, जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील, ॲड. राजेश कावरे, ॲड. समीर पटेल, ॲड. भूषण बऱ्हाटे, ॲड. जय भोसले, ॲड. शिवाजी सांगळे, ॲड. संजय पाटील, ॲड. सुहास टोणे, ॲड. नरेश गुगळे, जिल्हा न्यायालयीन व्यवस्थापक कृपावरम, वरिष्ठ लिपीक अमोल वाकचौरे, सुनिल विरकर उपस्थित होते.

अंजू शेंडे म्हणाल्या की, आपण न्यायाचे रक्षण करतोच, पण यासोबतच निसर्गाचे रक्षण करणे ही देखील आपल्या सामाजिक जबाबदारीचा एक भाग आहे. आजच्या घडीला वाढते तापमान, कमी होणारी पर्जन्यमान आणि पर्यावरणीय असंतुलन ही गंभीर आव्हाने आहेत. त्यामुळे अशा उपक्रमांद्वारे हिरवाईने परिसर नटवून पर्यावरण संवर्धन काळाची गरज बनली असल्याचे त्यांनी सांगितले.

लावलेल्या वृक्षाच्या देखभालीची जबाबदारी गार्डन कमिटीच्या वतीने स्विकारण्यात आलेली आहे. न्यायालयीन परिसर अधिक हरित करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध मोहिम सुरु असल्याचे यावेळी कमिटीच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

## अहिल्यानगरमध्ये २७ जूनला ‘निधी आपके निकट’ कार्यक्रम

नगर – निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांसाठी स्नेहालय, २३९ एफ ब्लॉक, एम.आय.डी.सी. अहिल्यानगर येथे २७ जून रोजी सकाळी ९.३० वाजता ’निधी आपके निकट’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

निवृत्तीवेतनधारक आणि कंपनी मालकांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या अडचणी असतील तर आवश्यक त्या कागदपत्रांसह या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कर्मचारी भविष्य निधी संघटनेच्या सहायक भविष्य निधी आयुक्तांनी केले आहे.

# हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण, विद्यार्थी व खेळाडूंना रोपांचे वाटप

**एक व्यक्ती, एक झाड उपक्रम, जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत व उमेद सोशल फाउंडेशनचा पुढाकार**

नगर – पर्यावरण संवर्धनासाठी एक व्यक्ती, एक झाड उपक्रमातंर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत व उमेद सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी फॅक्टरी येथील हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या अभियानात सहभागी झालेल्या विद्यार्थी व खेळाडूंना रोपांचे वाटप करुन घराच्या परिसरात लावण्याचे व त्याचे संवर्धन करण्याचे आवाहन करण्यात आले.

या उपक्रमाचे आयोजन फाउंडेशनचे उपाध्यक्ष व शाखाप्रमुख कुणाल तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून साई आदर्श मल्टीस्टेटचे संस्थापक शिवाजी कपाळे, हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र पुजारी, फाउंडेशनचे जनसंपर्क अधिकारी बाळासाहेब सगळगीळे, कार्यकारी अधिकारी राजेश मंचरे, संघटक श्रीकांत राऊत, ज्ञानेश्वर माने, संदीप पंडित आदी उपस्थित होते.



जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत व उमेद सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राहुरी फॅक्टरी येथील हॉलीबॉल मैदान परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

शिवाजी कपाळे म्हणाले की, पर्यावरण रक्षण ही आजची गरज असून, प्रत्येकाने एक झाड लावले तरी उद्याचे जग हरित आणि निरोगी होईल. वृक्ष हीच खरी संपत्ती आहे. एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील पिढीसाठी छायादार, प्रदूषणमुक्त वातावरण निर्माण करणे. हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून प्रेरणा घ्यावी आणि पर्यावरण रक्षणाची जबाबदारी घेण्याचे त्यांनी सांगितले.

कुणाल तनपुरे यांनी फाउंडेशनच्या माध्यमातून गरजू घटकातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप, आरोग्य शिबिरे, महिला सक्षमीकरण, तसेच पर्यावरण संवर्धनासाठी विविध प्रकल्प राबवले जात असल्याचे सांगून, विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. बाळासाहेब सगळगीळे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय, औषधी व सामाजिक महत्त्व समजावून सांगितले.

या उपक्रमासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, राज्य क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढावळे, प्रियंका खिंडारे, जय असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश शिंदे, उमेद फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, खजिनदार संजय निर्मळ, प्रमुख सल्लागार ॲड. दीपक धीवर यांचे मार्गदर्शन लाभले.



अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या भरतनाट्यमच्या प्रारंभीक ते विशारद पूर्ण तसेच गायन व भरतनाट्यम परिक्षांमध्ये श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थिनी.

# गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षेत ‘गुरुमाऊली संगीत’चे यश

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्यावतीने एप्रिलमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत नगरच्या श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. या परीक्षेत भरतनाट्यमच्या प्रारंभीक ते विशारद पूर्ण तसेच गायन व भरतनाट्यम परिक्षांसाठी बसलेले विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत यशाची परंपरा कायम ठवली, अशी माहिती विद्यालयाच्या संचालिका नृत्य तपस्वी सौ. वर्षा पंडित व चंद्रकांत पंडित यांनी दिली.

यामध्ये प्रारंभिक गायन परीक्षेत देविका साळुंखे, भरतनाट्यम प्रारंभिक परीक्षेत सियल पारख, आराध्या डोमे, सर्वज्ञा साळुंखे, क्रिशा देवखिले, अर्णवी शेलार, रिद्धी मुजगोंड, स्नेहा विखे, मधुरा दोमल, मृणाली नवले, निधी दातीर, श्रावणी रोकडे, अक्षरा ठाकरे, स्पृहा जहागिरदार आदींनी नैपुण्य मिळवले. तसेच प्रवेशिका प्रथम परीक्षेत सिया कानडे व जीविता इंगळे. प्रवेशिका पूर्ण परीक्षेत पूर्वा म्याना, आरोही साबळे, कार्तिकी गुंजाळ व भार्गवी वावरे. मध्यमा प्रथम परीक्षेत आराध्या सोनावणे व निलाक्षी वामने. मध्यमा पूर्ण परिक्षेत गौरी साठ्ये, मुग्धा देवचके, गोजिरी भावसार, पारिजा मगर, मुग्धा नांदोडे व पूजा जैन. भरतनाट्यम विशारद प्रथम परीक्षेत आस्था पिंगळीकर, रिया सरोवरे, दर्शना दंडवते व शर्वरी भंडारी. तसेच रुचिता ससाणे या विद्यार्थिनीने उत्तम यश संपादन करून विशारद पूर्ण भरतनाट्यम ही पदवी संपादन केली आहे.

# मुग्धा भट सामंत यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध



बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रत्नागिरी येथील गायिका मुग्धा भट सामंत यांची स्वरगंध ही मैफल रंगली.

नगर – रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे बंदिश सांगीतिक कला प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रत्नागिरी येथील गायिका मुग्धा भट सामंत यांची स्वरगंध ही मैफल रंगली. त्यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. सुरेल दमदार आवाज, लय ताल यांवर प्रभुत्व, सर्व गीतप्रकार सारख्या तयारीने गाणे ही त्यांच्या गाण्याची वैशिष्ट्ये होती. त्यांनी मैफलीची सुरुवात केदार रागातील पारन पायो ही विलंबित बंदिश आणि सैय्या मोरा रे ही द्रुत बंदिश या दोन बंदिशी गाऊन केली. नंतर दुर्गा रागातील सखी मोरी रुमझुम ही पारंपरिक बंदिश, द्रुत आणि तराना रंगतदारपणे सादर केला. संगीत बावन्नखणी नाटकातील प्रीतीचा कल्पतरू, राजसंन्यास नाटकातील भासे जनात राया संगीत रणदुन्दूभी नाटकातील जगी हा खास वेड्यांचा अशी अप्रचलित नाट्यपदे, आम्ही विठ्ठलाचे वारकरी, मास्टर कृष्णरावांनी लोकप्रिय केलेले देव म्हणे नाम्या, ही भक्तिगीते, माणिक वर्मा यांनी लोकप्रिय केलेली या मुरलीने कौतुक केले ही गवळण, मिश्र शिवरंजनी रागातील दादरा असे वैविध्यपूर्ण गीतप्रकार अतिशय तयारीने सादर केले. त्यांनी कार्यक्रमाची सांगता भैरवी मधील अच्युता अनंता या पदाने केली. त्यांना तबल्यावर शेखर दरवडे आणि हार्मोनियम वर मकरंद खरवंडीकर, टाळावर किरण जोशी, अनुज दरवडे, तंबोऱ्यावर वेदांत कुलकर्णी यांनी रंगतदारपणे साथसंगत केली. मोठमोठे इव्हेंट, मोठमोठ्या सभागृह आणि कार्यालयांमधून होणाऱ्या कार्यक्रमापेक्षा अशा पारंपारिक पद्धतीच्या मैफली आयोजित केल्या गेल्या पाहिजेत असे मत अनेक संगीत जाणकारांनी या प्रसंगी व्यक्त केले.

डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी प्रास्ताविक केले. ओंकार देऊळगावकर यांनी कलाकारांचा परिचय करुन दिला. अनघा पछाडे यांनी आभार मानले. अनुजा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. या प्रसंगी धनेश बोगावत, अशोक गांधी, रत्नाकर अपस्तंभ, अभिजित अपस्तंभ, ज्ञानेश्वर दुधाडे, महेश खोपटीकर, भूषण भणगे, पवन नाईक, सदानंद भणगे, चंद्रकांत पंडित, डॉ. हेमंत नाईक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अविनाश बोपर्डीकर, मिलिंद ऋषी, डॉ.धनश्री खरवंडीकर इत्यादींनी परिश्रम घेतले.

# शहरातील पहिले अद्ययावत स्पोर्टस् कॉम्प्लेक्स लवकरच पुर्णत्वास

**आ.संग्राम जगताप यांचे प्रतिपादन**

नगर – राज्य सरकारकडून मिळवलेल्या निधीतून शहरात दोन अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे कामे प्रगतीपथावर आहेत. यातील सारसनगर येथील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे काम जवळपास पूर्णत्वास आलेले असून लवकरच खेळाडूंसाठी उपलब्ध होणार आहे. यामुळे क्रीडाक्षेत्राला अधिक चालना व बळकटी मिळणार असून खेळाडूंची चांगली सोय होणार आहे, अशी माहिती आ.संग्राम जगताप यांनी दिली.



सारसनगर येथे उभारण्यात येत असलेल्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या कामाची पाहणी आ.संग्राम जगताप यांनी करून साईट इंजिनिअर व मनापा अभियंत्यांना सूचना केल्या.

आ.जगताप यांनी कॉम्प्लेक्सच्या कामाची पाहणी करून साईट इंजिनिअर व मनापा अभियंत्यांना सूचना केल्या. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, प्रा.माणिक विधाते, सुरेश बनसोडे, वैहाव ढाकणे, मनापा अभियंता श्रीकांत निंबाळकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

आ.जगताप पुढे म्हणाले, नगर शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलचा विकास झाला नसल्याने शहरातील खेळाडू चांगल्या सुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवून व पुरावा करून शहरात दोन अद्यावत स्पोर्ट्स कॉम्प्लेक्ससाठी निधी उपलब्ध केला. सर्व क्रीडा संघटनांना बरोबर घेत या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे कामे सुरु केले आहेत. या अद्यावत व स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समुळे शहरातील विविध क्रीडा प्रकारांना मोठी चालना मिळणार असून येथे सराव व स्पर्धा होणार आहेत. त्यामुळे खेळाडूंचे चांगले करियर येथून निर्माण होणार आहे.

यावेळी जॉय लोखंडे, राहुल बोरुडे, संतोष ढाकणे, गजानन भांडवलकर, चंद्रकांत औशीकर, अमोल नांगरे आदी उपस्थित होते.

यामध्ये इन डोअर खेळांसाठी दोन एकर जागेत दोन मजली इमारत उभारण्यात येर्त आहे. तळमजल्यावरील बॅडमिंटन हॉल मध्ये दोन बॅडमिंटन कोर्ट, टेबल टेनिस हॉल, स्वागत कक्ष प्रशासकीय कार्यलय, प्रशिक्षक रूम, खेळाडूंसाठी चेंजिंग रूम. पहिल्या मजल्यावर सुमारे १०० प्रेक्षकांची क्षमता असलेली प्रेक्षक गॅलरी, तसेच विविध खेळांसाठी सराव हॉल देखील आहेत. तसेच व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, टेनिस, कबड्डी कोर्ट, बॉक्स क्रिकेट, योगा आणि झुम्बासाठी जागा व बाहेरील मैदानात जॉगिंग ट्रक अशी रचना असणार आहे, अशी माहिती आर्किटेक्ट रोहित साळुंके यांनी दिली.



राज्य वॉटर पोलो स्पर्धेसाठी लोणी येथे जिल्हा निवड चाचणी स्पर्धा पार पडली.

# अहिल्यानगर जिल्हा वॉटर पोलो संघाची निवड

नगर – अहिल्यानगर जिल्हा वॉटर पोलो संघाची नुकतीच निवड करण्यात आली आहे. अमरावती येथे होणाऱ्या कुमार राज्य वॉटर पोलो स्पर्धेसाठी हा संघ खेळणार आहे.

लवकरच अमरावती येथे होत असलेल्या राज्य वॉटर पोलो स्पर्धेसाठी विखे पाटील सैनिक स्कूल, जलतरण तलाव, लोणी येथे जिल्हा निवड चाचणी स्पर्धा पार पडली. या स्पर्धेतून संघाची निवड सचिव रावसाहेब बाबर यांनी जाहीर केली आहे. निवड समितीमध्ये क्षितिज बाबर, प्रणित ढोकळे, ओंकार ढमाले यांचा समावेश होता.

अहिल्यानगर जिल्हा वॉटर पोलो संघामध्ये कर्णधार आर्यन धायतडक, सार्थक सरोदे, सार्थक इंडायक, तेजस पवार, गौरंग गवानकर, राजवर्धन पाटील, विर उनवणे, रणविजय घोरपडे, अक्रम शेख, कौस्तुभ चिवटे, प्रयागराज पवार, अर्णव पळशीकर, श्रेय गांधी व राखीव खेळाडू म्हणून जीत लाड, साईराम जाधव यांचा समावेश आहे.

संघाचे व्यवस्थापक म्हणून अकिल शेख व मार्गदर्शक योगिता तनपुरे जबाबदारी सांभाळत आहे.

स्पर्धेसाठी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष अभिजीत चव्हाण व विश्वजीत चव्हाण यांनी जिल्ह्याच्या संघाला शुभेच्छा दिल्या.

## नगरमध्ये २८ जून रोजी फिजिओथेरपी मोफत शिबीर

नगर – सावेडी, नोबल हॉस्पिटल शेजारी प्रेमदान चौकातील अहमदनगर रिहॅब सेंटर मध्ये २८ जून रोजी सकाळी ११ते ५ या वेळेत फिजिओथेरपी, कायरोप्रॅक्टीक, ऑस्टिओपॅथी मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पाठ दुखी, मान दुखी, मनक्याचे आजार गुडघ्याचे आजार, वेदना व्यवस्थापन आणि पुनर्वसन यावर मोफत मार्गदर्शन करून उपचारावर ५०% सूट दिली जाणार आहे, अशी माहिती सेंटरचे डॉ. किशन गोपाल राजपूत यांनी दिली. अधिक माहितीसाठी ९१ ७६६६२९२०९७/ ९१ २४१ ३५८ ७७४६.

## रुईछत्तीशी येथील जनता महाविद्यालयात बी.एस्सी कॉम्प्युटर व एम.एस्सी नवीन अभ्यासक्रमांना मान्यता

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे रुई छत्तिसी (ता. नगर) येथील जनता कला व विज्ञान महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासुन विज्ञान विभागास नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता मिळाली आहे. यात बी. एस्सी कम्प्युटर व एम.एस्सी केमेस्ट्री (ऑर्ग्यातीक व नालिटीकल) या अभ्यासक्रमाचा समावेश आहे,



अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोहर करांडे, उपप्राचार्य डॉ. डी. एस. तळुळे व विज्ञान विभाग प्रमुख रविराज सुपेकर यांनी दिली.

नवीन अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून परिसरातील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



प्रभागातील नागरिकांसाठी अल्पदरात रुग्णवाहिका सेवेची सुरुवात चंद्रकांत उर्फ काका शेळके यांच्या पुढाकाराने आणि सूर्या फाउंडेशनच्यावतीने करण्यात आली आहे.

# काका शेळके यांच्या पुढाकाराने सूर्या फाउंडेशनकडून नागरिकांसाठी रुग्णवाहिका

नगर – प्रभागातील नागरिकांसाठी अल्पदरात रुग्णवाहिका सेवेची सुरुवात चंद्रकांत उर्फ काका शेळके यांच्या पुढाकाराने आणि सूर्या फाउंडेशनच्यावतीने करण्यात आली आहे. याचा लाभ प्रभागातील तसेच शहरातील गरजू रुग्णांना कोणतेही शुल्क न आकारता दिला जाणार आहे. ही सेवा गरजूंसाठी नेहमी तत्पर राहणार असून, नागरिकांनी याचा योग्य फायदा घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

कार्यक्रमात रुग्णवाहिकेचे पूजन करून लोकार्पण करण्यात आले. यावेळी नगरसेविका कालावधी शेळके, आढाव साहेब, साबीर सय्यद, गीते डॉक्टर, मते मॅडम, लक्ष्मण शेळके, मुळे काका, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना काका शेळके म्हणाले की, सामाजिक जबाबदारी म्हणून आपल्याला जे काही शक्य आहे, ते करायचे, ही माझी भूमिका आहे. अपघातग्रस्त किंवा अचानक आजारी पडलेल्या गरजू रुग्णांना वेळेवर उपचार मिळावे, त्यांना हॉस्पिटलमध्ये पोहोचवण्यासाठी कोणत्याही आर्थिक अडचणीमुळे खोळंबा होऊ नये, म्हणूनच ही मोफत रुग्णवाहिका सेवा सुरु केली आहे. गरजूंना वेळेवर मदत मिळणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे, असे काका शेळके यांनी सांगितले.

या उपक्रमामध्ये अनेक सहकार्यांनी आणि सामाजिक संस्थांनी सहकार्य दिले आहे. हे फक्त माझे काम नसून, समाजासाठी सर्वांनी मिळून उभा केलेला एक उपयुक्त उपक्रम आहे. ही सेवा निरंतर सुरु राहावी यासाठी प्रत्येक नागरिकाने जागरूक राहून गरजूंपर्यंत ही माहिती पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले. भविष्यातही आरोग्यविषयक सुविधा वाढवण्याचा आमचा प्रयत्न राहील, असेही शेळके यांनी नमूद केले.

# दिव्यांगांसाठी राज्य सल्लागार मंडळाच्या जिल्हास्तरीय समितीवर बाबासाहेब महापुरे



नगर – महाराष्ट्र राज्य दिव्यांग हक्क अधिनियम २०२४ मधील तरतुदी नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिव्यांगांसाठी राज्य सल्लागार मंडळाची जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीच्या अशासकिय सदस्यपदी सावली दिव्यांग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नुकतेच जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी सदस्य निवड बाबतचे आदेश काढले आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीच्या माध्यमातून जिल्हा समितीच्या बैठका घेऊन दिव्यांग व्यक्तीच्या पुनर्वसन व सक्षमीकरणाबाबत जिल्हा प्राधिकरणास सल्ला देणे, जिल्हा नियोजन व विकास परिषदांचे कामकाज आणि समुचित प्राधिकरणाने दिव्यांगाच्या कल्याणासाठी निर्धारित केलेल्या ५ टक्के निधीच्या खर्चावर देखरेख ठवणे व आढावा घेणे, दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाच्या दिव्यांगासाठीच्या योजनांची, कार्यक्रमाची अंमलबजावणी करतांना जिल्हा प्राधिकारी यांना सहाय्य करणे, दिव्यांग अधिनियमातील तरतुदींची जिल्हा प्रशासनाद्धारे अंमलबजावणी न करण्याबद्दलच्या तक्रारींची दखल घेऊन संबधीत तक्रारीच्या अनुषंगाने सुयोग्य उपाययोजना करण्याबाबत संबधीत प्राधिकरणास शिफारस करणे, त्याच बरोबर अधिनियमातील कलम २३ मधील ४ अंतर्गत तक्रार निवारण अधिकाऱ्यानं केलेल्या कारवाईमुळे व्यथीत झालेल्या शासकिय आस्थापनावरील कर्मचाऱ्यांच्या तक्रारीची दखल घेऊन सुयोग्य उपाययोजनांची शिफारस करण्याबरोबरच शासनाने नेमून दिलेल्या कोणत्याही प्रकारचे कार्य समितीच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचा आढावा घेणे, ही कामे समितीच्या माध्यमातून केली जाणार असल्याची माहिती बाबासाहेब महापुरे यांनी दिली.

दिव्यांग बांधवाच्या प्रत्येक समस्येवर मार्ग काढण्यासाठी सावली दिव्यांग कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून कायम प्रयत्नशील राहणार असल्याचे महापुरे यांनी सांगीतले.

# श्रीक्षेत्र मांडवगणला स्व.भगवंतराव देशमुख स्मारक समितीची स्थापना

## अध्यक्षपदी झुंबरराव बोरुडे व उपाध्यक्षपदी सिद्धेश्वर देशमुख यांची निवड

नगर – श्रीक्षेत्र मांडवगण (ता. श्रीगोंदा) येथील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या परिसरात स्व. इंजिनिअर भगवंतराव देशमुख यांचे स्मारक बांधण्यात येणार आहे. यासाठी स्व. भगवंतराव देशमुख स्मारक समितीची स्थापना करण्यात आली असून, या समितीच्या अध्यक्षपदी इंजि. झुंबरराव बोरुडे व उपाध्यक्षपदी सिद्धेश्वर देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

स्व. इंजिनिअर भगवंतराव देशमुख यांचे स्मारक उभारणीचा आराखडा अहिल्यानगरचे आर्किटेक इंजि. अनिल घोडके यांनी तयार करून दिला आहे. हे काम आकर्षकपणे आणि लवकर पूर्ण करण्यासाठी स्मारक समितीची नुकतीच सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. सदस्यपदी सुरेश लांडगे, ॲड. मनोज देशमुख, दत्तात्रय बोरुडे, विजय झगडे, धनंजय लोखंडे यांचा समावेश आहे.

स्मारकाच्या कामासाठी लवकरच निधी संकलनाच्या कामाला सुरुवात करणार असल्याचे अध्यक्ष झुंबरराव बोरुडे आणि उपाध्यक्ष सिद्धेश्वर देशमुख यांनी सांगितले.

स्मारक समितीच्या कामासाठी सर्व ग्रामस्थांनी देणगी देऊन सहकार्य करावे, असे आवाहन बाळासाहेब देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी विनोद देशमुख ९२८४२९६१९२.



नेप्ती येथील स्वस्तिक मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# नेप्ती येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरास प्रतिसाद

## शासन आपल्या दारी उपक्रमाचा ग्रामस्थांनी घेतला लाभ, महसूल व कृषी योजनांचा लाभ देऊन विविध दाखले वाटप

नगर – नेप्ती येथील स्वस्तिक मंगल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या वतीने हे शिबिर पार पडले. शिबिराला गावांमधून नागरिकांनी उपस्थित राहून सकारात्मक प्रतिसाद दिला. यात नागरिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, नॉन क्रिमिलिअर दाखला अशा महत्त्वपूर्ण कागदपत्रांचे वाटप करण्यात आले. त्यामुळे अनेकांना शिक्षण, नोकरी व शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महसूल विभागासह कृषी विभाग, समाजकल्याण विभाग, आणि संजय गांधी निराधार योजना विभागाने देखील या शिबिरात सहभाग नोंदवला. नागरिकांना संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना, श्रावणबाळ योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, महाडीबीटीवरील योजनांद्वारे फळबाग लागवड आणि शेतीसाठी अनुदान मिळवून देण्यात आले.

या शिबिराप्रसंगी माजी जि.प. सदस्य अरुण होळकर, बी.आर. कर्डिले, रामदास फुले, रामराव कांडेकर, अनिल पवार, पांडुरंग कळमकर, अमोल चौगुले, अमोल औटी, सूरज पवार, सुभाष नेमाने, बाळासाहेब काळे, मंगल कांडेकर, शिवांजली कांडेकर, प्रकाश कांडेकर, लक्ष्मण कांडेकर, हौशीराम जपकर, गणेश वाळके, अभिजित शेटे, शिवाजी होळकर, परिसरातील गावचे सर्व सरपंच, नायब तहसीलदार गणेश भानवसे, नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे, नेप्ती मंडळातील तलाठी संतोष पाखरे, दिपक झेंडे, विनायक दिक्षे, सुवर्णा रांधवण, रुपाली म्हस्के, दिपाली विधाते, संजय गांधी शाखेचे महसूल सहायक विक्रम सदाफुले, श्रीमती बुरा, कृषी सहाय्यक रावसाहेब नवले, रमेश खाडे, तसेच ग्रामसेवक अनुजा लाकूडझोडे तसेच सर्व गावातील कोतवाल, सेतू केंद्र संचालक उपस्थित होते.

एकाच छताखाली अनेक सेवा ही संकल्पना या शिबिराच्या माध्यमातून प्रत्यक्षात उतरवली गेली. नागरिकांना विविध खात्यांची कार्यालये न फिरता, एकाच ठिकाणी सेवा मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# स्थापत्य अभियांत्रिकी परीक्षेत रियान शेख प्रथम श्रेणीत उत्तीर्ण



नगर – शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा अंतिम वर्ष स्थापत्य अभियांत्रिकीचा निकाल नुकताच लागला. महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एजुकेशनतर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेत नगर येथील शेख रियान हा विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला.

आठरे पाटील पब्लीक स्कुलमधून शालेय शिक्षण घेत दहावीत प्रथम श्रेणीत रियान उत्तीर्ण झाला होता आणि त्यानंतर स्थापत्य अभियांत्रिकीत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आणि पुढे अभियांत्रिकी पदवी करण्याचा त्याचा मानस आहे.

नगरचे गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर नाजीर शेख यांचे चिरंजीव आहे.



आनंदऋषी हॉस्पीटल, अहिल्यानगर येथे गेले ३४ वर्षापासुन अनिल मेहेर संचलित 'आनंदयोग' वर्गातील योग साधकांकडून आनंदधाम येथे योग दिन आवडीने व उत्साहात साजरा करण्यात आला.

# काळाची गरज असल्याने रोजच 'योगा दिवस' व्हावा

## कुंदनऋषीजी म.सा. यांचे प्रतिपादन

नगर – ३४ वर्षापासुन अनिल मेहेर संचलित 'आनंदयोग' वर्गातील योग साधकांकडून आनंदधाम येथे योग दिन उत्साहात साजरा करण्यात येतो.

यावर्षी २१ जून रोजी सकाळी ५.४५ ते ७.३० वा. आनंदऋषी हॉस्पीटल येथे अनिल मेहेर यांनी स्वतः योगासन, प्राणायम बाबतची माहिती सांगून प्रत्यक्ष योगासनातील आसन करुन त्याचे महत्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या वेळी जैन मुनी श्री कुंदनऋषी महाराज यांनी स्वतः योगासन, प्राणायम बाबतची माहितीने उपस्थितांना संबोधित केली. आजच्या या धकाधकीच्या आयुष्यात शारीरीक, मानसिकता सुदृढ ठेवण्यासाठी योगाचे अनन्य साधारण महत्व पटवून दिले व प्रत्येकाने आपला दिनचर्येत योगाचा स्विकार करण्यात येवुन आपले शरीर हे निरोगी व प्रसन्न राहण्यासाठी संकल्प करण्याचे संबोधित केले. योग ही एक जादूची काडी आहे व तिचा वापर करता वय जसजसे वाढत जाते तसतसे ते यंग (तरुण) होत जाते. योगा केल्याने मन उत्साहित होऊन शरीरास एक प्रकारची उर्जा मिळते. तेव्हा लहान, जवान, वृध्द, पुरुष, महिला सर्वांनाच जीवनात योगाचा स्विकार करणे अत्यावश्यक आहे हे पटवून दिले.

आनंदयोग वर्गातील साधकांनी योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार, झुंबा डान्स, नाटिका वेगवेगळ्या प्रकारचे हास्य घेऊन योगाचे अनन्यसाधारण महत्व पटवून दिले. कार्यक्रमात हास्य सम्राट रमेश बोरा यांनीही वेगवेगळ्या हास्याचे प्रात्यक्षिक दाखवून त्याचे महत्व पटवून दिले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हेमा पडोळे, उज्वला नवले, स्मिता धोत्रे, अर्चना मेहेर, सुनिता परभणे, जयश्री भंडारी, आशा गांधी, वैशाली वाघस्कर, रंजना रिसे, भावना मेहेर, सुनिता गुगळे, निता शहा, निता जाधव, सुरेखा गांधी, आशा पालवे, सारीका बडेरा, सुरेखा ताकपेरे, ज्योती खताळ, वैशाली फुलसौंदर, गिरवले मॅडम, राणी फुलसौंदर, सिकची शैलेजा, सुरेखा घंगाळे, हेमलता घोडेकर, सतिष पडोळे, दिपक नवले, उमेश बलदोटा, ॲड अनिल धोत्रे, राजेंद्रप्रसाद सिकची, विनोद घोडेकर, किशोर सुराणा, प्रकाश गांधी, अनिल पोखरणा, प्रा. सुनिल जोश, चंदु शिंगवी, राजीव भळगट, सुशिल शिंगवी आदी साधकांनी परिश्रम घेतले.

# छत्रपती अभियांत्रिकीमध्ये 'योगा फॉर वन अर्थ वन हेल्थ'



नगर – नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून रोजी साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यातर्फे आयोजित या कार्यक्रमामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांना योगा विषयक प्रात्यक्षिके आणि त्याचे महत्त्व समजून सांगण्यासाठी अहिल्यानगर मधील 'आरंभयोग' चे संस्थापक गणेश कुलथे हे योगाचार्य लाभले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना ज्ञानसाधना पद्धती, हटयोग साधना, शरीर मन शुद्धी साधना अशा बऱ्याच विषयांची माहिती देऊन योगा प्रात्यक्षिके सर्वांकडून करून घेतली.

योग हा एक सखोल अभ्यास आहे ज्यामध्ये शारीरिक मुद्रा, ध्यान आणि नैतिक मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट आहेत. प्राचीन भारतात रुजलेली, ती व्यक्तीला परमात्म्याशी जोडण्याचा आणि सर्वांगीण कल्याण करण्याचा प्रयत्न करते. शारीरिक पैलू, विविध मुद्रांचा समावेश, लवचिकता आणि सामर्थ्य सुधारते. शारीरिक आरोग्य, मानसिक व भावनिक स्पष्टता यांचे संतुलन राखण्यासाठी योगा अतिशय महत्त्वाचा असल्याचे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे यांनी केले. या कार्यक्रमास सर्व विभागप्रमुख प्रा. पी. जी. निकम, डॉ. एम. के. भोसले, डॉ. व्ही. व्ही. पाटील, प्रा. ए. बी. काळे, एन. एम. बुधवंत तसेच राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी प्रा. अक्षय देखणे, प्रा. अमेय कुलकर्णी, प्रा. अक्षय कांबळे यांच्यासमवेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. अक्षय देखणे यांनी करून दिला.

# यौगीक जीवन पध्दतीवर तज्ञांचे २९ जून रोजी मार्गदर्शन

नगर – दैनंदिन जीवनात योगाचा उपयोग कशाप्रकारे करून घेतला पाहिजे, योगाने प्रपंचातील प्रश्न कसे सुटतील, माझी योग साधना योग्य आहे काय? तसेच आधुनिक पिढीला योग मार्गावर येण्यासाठी कसे प्रयत्न करावेत? यासंदर्भात यौगीक जीवन पध्दती या कार्यक्रमात ८० वर्षाचे अनुभवी व प्रथम पंतप्रधान योग पुरस्कार सन्मान डॉ. विश्वासराव मंडलिक मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम २९ जून रोजी सावेडी माऊली संकुल येथे सकाळी ९.३० वा. होणार आहे.

योगाचा अभ्यास केल्यानंतर माणसाचे शारिरीक व मानसिक आरोग्य उत्तम रहाते. त्याचबरोबर आपले सामाजिक व कौटुंबिक स्वास्थही उत्तम घडते. परंतु एक तास योग केला म्हणजे योगाचे सर्व फायदे मिळतील असे नाही तर दिवसभर आपले वागणे – बोलणे योगानुकूल पाहिजे. म्हणून यौगीक जीवन पध्दती या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात मानसोपचार तज्ञ डॉ. सुचित तांबोळी, आयुर्वेद तज्ञ डॉ. महेश मुळे, प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे व ॲड. निर्मला चौधरी सहभागी होणार आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन योग विद्या धाम संस्थेने केले आहे.

# द आयकॉन् पब्लिक स्कूलमध्ये योग दिन उत्साहात साजरा



नगर – स्टेशन रोडवरील द आयकॉन् पब्लिक स्कूलमध्ये योग दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात एका सभेने झाली. विद्यार्थ्यांनी विविध योगासनांचे सादरीकरण केले. या सादरीकरणातून योगातून मिळणारी अंतर्गत शांती आणि समतोलता अगदी प्रकट झाली.

यानंतर १ वी ते १० वी पर्यंतचे विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्र येऊन योग सत्रात भाग घेतला. योग प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी प्राणायाम, ध्यान व ताणसाधने केल्या.

विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयीची माहिती वाढावी यासाठी एक 'योग विषयक सामान्य ज्ञान प्रश्नमंजुषा' देखील आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्साहाने त्यात भाग घेतला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. दीपिका नागरवाला यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा समारोप ध्यान सत्र आणि विद्यार्थ्यांनी 'दररोज योग करू, तणाव दूर ठेवू! या सामूहिक शपथेसह झाला. विद्यार्थ्यांच्या आनंदी सहभागाने, भारताच्या आध्यात्मिक वारशाची जाणीव आणि आजच्या तरुण पिढीची सकारात्मक उर्जा यांचे सुंदर मिश्रण अनुभवायला मिळाले.

शरद मुथा एज्युकेशन सोसायटी अंतर्गत द आयकॉन पब्लिक स्कूल ही अहिल्यानगरच्या मध्यभागी असलेली एक स्थापित सीबीएसई संलग्न शाळा आहे. जी नर्सरी ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देते.

# मानसिक शांतीबरोबरच शारीरिक सुदृढतेसाठी योगासने आवश्यक

## प्रमिला अग्रवाल यांचे प्रतिपादन; अल्ट्राटेक सिमेंट कंपनी आणि आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशनच्यावतीने योग दिन साजरा



अल्ट्राटेक सिमेंट कंपनी आणि आर्किटेक्ट इंजिनीअर्स अँड सर्व्हेअर्स असो यांच्यावतीने जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

नगर – आपल्या दिवसाची सुरुवात योगाने करण्याचे आवाहन केले. पातंजल योग सूत्राचा आणि अष्टांग योगाचा अवलंब करावा. योगासाने शक्यतो सकाळच्या वेळेत करावे किंवा सायंकाळी योगासने करायची असल्यास दुपारचे जेवण झाल्यावर चार पाच तासाने करावीत. योगासने हे नेहमी हळूवार आणि मन शांत एकाग्र ठेऊन करावीत. नियमित योगासने केल्यावर शरीरात विविध क्रिया योग्य मार्गाने आणि सुरळीत होण्यास मदत होते. आपल्या शरीराची सिस्टिम योग्य मार्गास आणण्याचे काम प्राणायाम आणि योगासने करतात. दीर्घकाळ आणि नियमित योगासने केल्यास त्याचे चांगले परिणाम आपले मन आणि शरीरावर होतात. योगासने कोणीही करू शकते त्यासाठी योग्य मार्गदर्शन देणारे प्रशिक्षक आवश्यक असून आपण आपल्या स्वतःसाठी रोज एक तास यासाठी देणे गरजेचे आहे. तसेच जास्त ताणतणाव न घेता आपल्या शारीरिक क्षमतेप्रमाणे आणि आरामदायक स्थितीमध्ये आसने करावीत. स्थिरम सुखम आसनम या श्लोकाप्रमाणे जास्त जोरजोरात व्यायामाप्रमाणे वर्क आऊट न करता योगासनांच्या प्रत्येक स्थितीमध्ये आवश्यक तेवढा वेळ थांबणे गरजेचे आहे. मनावर नियंत्रण आणायचे असेल तर श्वासावर नियंत्रण मिळवणे गरजेचे असून त्यासाठी नियमित प्राणायाम करणे आवश्यक असल्याचे योग शिक्षिका प्रमिला अग्रवाल यांनी सांगितले.

आर्किटेक्ट इंजिनीअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असो आणि अल्ट्राटेक सिमेंट कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिनाचे औचित्य साधून संस्था सभासद आणि कुटुंबीयांसाठी योग शिबिर प्रात्यक्षिक आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्रमिला अग्रवाल यांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमास अल्ट्राटेक सिमेंटचे मार्केटिंग ऑफिसर पराग जोशी, प्रविण काकडे, एसा सचिव अभिजीत देवी, जितेश सचदेव, भुषण पांडव, यश शहा, सुनिल औटी, अनिल साळुंके , निलेश सब्बन, योगेश परदेशी, विजय पादिर, अन्वर शेख, अजय दगडे, सुनिल जाधव, अनिल धोकरीया, दीपक मुथा, श्वेता वाळके, अनिल आठरे, विजय उजनीमठ,किरण टकले व सभासद त्यांचे कुटुंबिय तसेच अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

योग शिक्षिका प्रमिला अग्रवाल यांनी एमए योग शास्त्रमध्ये शिक्षण पुर्ण केले असून त्या त्रिगुण योगा सेंटर अंतर्गत प्राणायाम, फेस योगा, उंची वाढीचे वर्ग, पाठ दुखी साठी, वेगवेगळ्या व्याधींवरील वर्ग, गरोदर महिलांसाठी नियमित योग वर्ग घेतात. त्यांनी आत्तापर्यंत दहा हजारा पेक्षा जास्त साधकांना योग शिकवला आहे.


यावेळी सुनिल महाजन व गायत्री जोशी यांनी योगगीत सादर केले. त्यास अजित माने यांनी कोरस दिला. तर मधुकर बालटे यांनी योगावर छान कविता सादर केली तर संस्था सभासद श्वेता मुळे यांची कन्या राजवी मुळे हिने उत्कृष्ट योगासने सादर केली. राजवी ही अवघ्या सात वर्षाची असून नाशिक मध्ये जिल्हा क्रीडा विभाग, मराठा विद्या प्रसारक समाज तसेच नाशिक महापालिका यांनी योग दिनानिमित्त तिला खास आमंत्रित केले होते.

यावेळी बोलताना अल्ट्राटेक सिमेंट कंपनीचे टेरीटरी अधिकारी प्रशांत जाधव यांनी आंतरराष्ट्रीय योगा दिनाचे महत्त्व सर्वांना समजण्यासाठी अल्ट्राटेक सिमेंट कंपनीने हा उपक्रम राबविण्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप तांदळे यांनी केले, तर प्रशांत जाधव आणि सचिव अभिजित देवी यांनी स्वागत केले. पराग जोशी यांनी कार्यक्रम यशस्वी झाल्याबद्दल सर्वांचे आभार मानले.

# घड्याळासाठी २२३ कोटी रुपये!

एखाद्या घड्याळाची किंमत किती असेल? पाच हजार, दहा हजार, फार फार तर काही लाख रुपये. मात्र स्वीत्झर्लंडमधल्या लिलावात एका घड्याळाला २२३ कोटी रुपयांची किंमत मिळाली. मध्यंतरी स्वीत्झर्लंडमध्ये हा लिलाव पार पडला. त्यावेळी एका घड्याळाला ३१ दशलक्ष स्वीस फ्रँक म्हणजे जवळपास २२३ कोटी रुपये किंमत मिळाली. घड्याळ्याच्या किंमतीबद्दल कळल्यानंतर कोणाचेही डोळे पांढरे होतील. या घड्याळाच्या लिलावाची प्रकि'या अवघ्या पाच मिनिटात पार पडली. आता ही रक्कम दान करण्यात येणार आहे. याआधी २०१७ मध्ये डायटोना रोलेक्स घड्याळ १२७ कोटी रुपयांचा विकलं गेलं होतं. हे आजवरचे सर्वात महागडं घड्याळ होतं. हे घड्याळ पाटेक फिलिप कंपनीचं असून ओन्ली वॉच असं त्याचं नाव आहे. या घड्याळाला २.५ ते तीन दशलक्ष स्वीस फ्रँक मिळतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली होती. पण त्यापेक्षाही खूप जास्त किंमत मिळाली. पाटेक फिलिप कंपनीचं हे घड्याळ इतर घड्याळांपेक्षा खूप वेगळं आहे. म्हणूनच या घड्याळाला एवढी किंमत मिळाली.



**एक धाव जनजागृतीसाठी**

इंग्लंडमधल्या ब्रिस्टल शहरात रहाणाऱ्या निक बटर नावाच्या व्यक्तीने नवा विक्रम केला आहे. निक जगातल्या १९६ देशांमधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाला आहे. अशी कामगिरी करणारा तो जगातला पहिलाच माणूस आहे. ३० वर्षांचा निक ग्रीसची राजधानी अथेन्समधल्या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी झाला होता. निक बँकेत काम करायचा. मित्र केविन वेबरकडून निकला काही तरी जगावेगळं करण्याची प्रेरणा मिळाली. त्याच्या या मित्राला प्रोस्टेट ग्रंथींचा कॅन्सर होता. या जगात सगळंच अशाश्वत आहे, असं वाटल्यानंतर निकने आपल्या पद्धतीने आयुष्य जगायचं ठरवलं. तो समाजकार्यासाठी मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होतो. या धावेच्या माध्यमातून त्याने भारतीय चलनात जवळपास एक कोटी ७९ लाख रुपयांचा निधी जमा केला आहे. तो ही रक्कम कॅन्सरपीडितांना देणार आहे. यासोबतच तो प्रोस्टेट कॅन्सरबाबत जागरूकता निर्माण करतो आहे. हा विश्वविक्रम करताना त्याला बऱ्याच अडचणींना सामोरं जावं लागलं. त्याला कुत्रं चावलं. एकदा अपघातही झाला. मात्र या सर्व परिस्थितीला सामोरं जात त्याने मॅरेथॉनमध्ये धावण्याचा विक्रम पूर्ण केला.

**नाकातून काढला दात**

कोणाच्या नाकात दात वाढू शकतो का? या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असंच द्यावं लागेल. मात्र या जगात काहीही घडू शकतं. चीनमधल्या ३० वर्षांच्या झांग बिन्सेंगच्या नाकातून दात काढण्यात आला आहे. श्वास घ्यायला त्रास होऊ लागल्यानंतर झांग डॉक्टरांकडे गेला. यानंतर त्याची क्ष-किरण चाचणी करण्यात आली. या चाचणीतून धक्कादायक बाब समोर आली. त्याच्या नाकात दात असल्याचं स्पष्ट झालं. यामुळे डॉक्टरही चक्रावून गेले. या दाताची लांबी जवळपास एक सेंटीमीटर होती. गेल्या २० वर्षांपासून त्याच्या नाकात दात आहे. मात्र गेल्या तीन महिन्यांपासून त्याला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याची हुंगण्याची क्षमताही कमी झाली होती. याच कारणामुळे झांगने डॉक्टरांचा सल्ला घ्यायचं ठरवलं. दहा वर्षांचा असताना पडल्यामुळे झांगचा दात तुटला आणि नाकात जाऊन बसला. हा दात इथेच रुजला. आता २० वर्षांनी त्याला त्रास जाणवू लागला. डॉक्टरांनी अर्धा तास शस्त्रकि'या केल्यानंतर नाकातला हा दात काढला.

# कॅलिडोस्कोप

## पाण्यासाठी मधली सुट्टी

पाणी म्हणजे जीवन. निरोगी रहाण्यासाठी भरपूर पाणी प्यायला हवं. भरपूर पाणी प्यायल्यामुळे शरीरातले विषारी घटक मुत्रावाटे बाहेर पडतात. आपली त्वचा तजेलदार दिसू लागते. पण आपण पुरेसं पाणी पित नाही. पाणी पिण्याकडे आपलं दुर्लक्षच होतं. लहानपणापासूनच पाणी पिण्याची सवय लागली तर पुढे आरोग्य उत्तम राहू शकतं. म्हणूनच केरळ सरकारने अनोखा उपक'म सुरू केला



आहे. इथल्या शाळांमध्ये 'वॉटर बेल' वाजवली जाते. वॉटर बेल वाजली की मुलांना वॉटर ब्रेक मिळतो. ब'क मिळताच मुलांनी पाणी प्यायचं. राज्य सरकारने सरकारी शाळांमध्ये हा उपक'म सुरू केला आहे. शाळेच्या वेळेत तीन वेळा ही बेल वाजवली जाते. आता आपल्याला पाणी प्यायचं आहे, याची जाणीव मुलांना करून देण्यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सकाळी १०.३५, दुपारी १२ आणि दोन वाजता घंटा वाजवली जाते. मग १५ ते २० मिनिटांमध्ये मुलं पाणी पिऊ शकतात. केरळ सरकारच्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन कर्नाटक आणि तमिळनाडू सरकारनेही अशा प्रकारचा उपक्रम राबवण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. केरळ सरकारचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.

# मुलीनेच लावले आईचे लग्न!

उत्तर प्रदेशातील अलीगढमधील महिला जावयासोबत पळून गेल्याची घटना ताजी असताना अजून एक तशीच घटना घडली आहे. बस्ती जिल्ह्यातील बंडा क्षेत्रात राहणार्याय एका महिलेच्या पतीचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले. तिला तीन मुले आणि एक मुलगी आहे. लग्नाचे वय झाले म्हणून तिने नातेवाइकांना लेकीसाठी मुलगा शोधायला सांगितला. वीस वर्षाच्या लेकीसाठी २३ वर्षीय शेतकरी तरुण जोडीदार म्हणून निवडण्यात आला. लग्नाची तारीख ठरणे बाकी होते. दोन्ही घरात सनईचौघड्याची तयारी सुरू झाली. अशात लेकीच्या आईचे लग्नाच्या तयारीनिमित्त भावी जावयाशी फोनवर बोलणे सुरू झाले.

जावई लेकीपेक्षा आईशी तास न तास गप्पा मारत होता. लेकीच्याही काही गोष्टी लक्षात आल्या. मुलगी म्हणाली, माझे लग्न ठरल्यानंतर आईच्या स्वभावात बदल दिसत होता. आई अनेक वेळा लपून छपून फोनवर बोलताना दिसायची. होणारा जावई गावात अनेक वेळा ये-जा करायचा. पण तो कधीही त्या तरुणीला भेटला नाही. त्यामुळे तिला काही तरी गडबड असल्याची शंका आली. त्यानंतर तिने त्या तरुणावर पाळत ठेवली. तेव्हा आई जावयाशी तासन् तास बोलत असल्याचे समोर आले. मग तिने तरुणाला फोन करून विचारले. त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. पण नंतर आईनेच आपण जावयाच्या प्रेमात असल्याची कबुली दिली. शेवटी लेकीने मोठा निर्णय घेतला. समाजात बदनामी होऊ नये म्हणून तिने एका मंदिरात आपल्या होणार्याे नवर्याचे लग्न स्वत:च्याच आईशी लावून दिले.



# ...म्हणून उंची मोजतात संध्याकाळी



वजन मोजायचे असेल तर ते सकाळी उठल्यावर लघवी झाल्यानंतर मोजायला हवे. तसेच उंची संध्याकाळी मोजायला हवी. तज्ज्ञांच्या मते प्रत्येक गोष्टीमागे काही कारणे असतात. एअर होस्टेस किंवा लष्करात भरती होताना त्यांची उंची मोजण्याची वेळ बहुतेक संध्याकाळी असते. हा योगायोग नाही, तर त्यामागे एक वैज्ञानिक कारण आहे.

दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी आपली उंची थोडी बदलत राहते. खरेतर दिवसभराच्या कामामुळे आणि गुरुत्वाकर्षणाच्या प्रभावामुळे आपला पाठीचा कणा थोडा आकुंचन आणि प्रसरण पावत असतो. सकाळी उठताना शरीराला विश्रांती मिळालेली असते. त्यावेळी पाठीच्या कण्यामध्ये थोडी लवचिकता येते आणि उंची थोडी जास्त भरते. आपण सकाळी उठतो तेव्हा आपल्या इंटरव्हर्टेब्रल डिस्क्स म्हणजेच पाठीच्या मणक्यांमधली जागा थोडी वाढलेली असते. त्यामुळे शरीर थोडे उंच दिसते. दिवस जातो तसे गुरुत्वाकर्षण शरीरावर परिणाम करते आणि या डिस्क्स आकुंचन पावू लागतात, ज्यामुळे उंचीमध्ये एक ते दीड सेंटीमीटरचा फरक होऊ शकतो.

डॉक्टर आणि फिटनेस तज्ज्ञांच्या मते सकाळी आणि संध्याकाळी उंचीमध्ये थोडा फरक असणे सामान्य आहे. म्हणूनच उंची मोजण्यासाठी दुपार किंवा संध्याकाळ सर्वोत्तम वेळ मानली जाते.

विमान वाहतूक उद्योग आणि संरक्षण दलांमध्ये उंचीचे ठरावीक निकष आहेत. सकाळी उंची मोजली तर ती कृत्रिमरित्या जास्त असू शकते आणि उमेदवार पात्र ठरू शकतो. पण प्रत्यक्ष आणि कायमची उंची जाणून घेण्यासाठी ती संध्याकाळी मोजली जाते.

# रद्दीतून उघडले नशीब

घर साफ करताना एक व्यक्तीला वडिलांची ३५ वर्षे जुनी कागदपत्रे सापडली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या कागदपत्रांना तो रद्दी समजत होता. पण प्रत्यक्षात त्या कागदपत्रांची किंमत कोट्यवधींची होती.



त्या व्यक्तीच्या म्हणण्यानुसार, त्याच्या वडिलांनी ९० च्या दशकात जेएसडब्ल्यू स्टीलचे काही शेअर्स खरेदी केले होते. त्या शेअर्सची किंमत आज कोट्यवधी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. त्या शेअर्सचीच ही सर्टिफिकेट्स आहेत. आजकाल ही पोस्ट इंटरनेटवर बरीच व्हायरल झाली आहे. त्यावर युजर्सच्या प्रतिक्रिया रंजक आहेत.

या व्यक्तीच्या वडिलांनी १९९० मध्ये जेएसडब्ल्यू स्टीलचे शेअर्स सुमारे १ लाख रुपयांना खरेदी केले होते. ३० वर्षे सुरक्षित ठेवल्यानंतर, आज त्यांची एकूण किंमत सुमारे ८० कोटी रुपये झाली आहे. ही बातमी प्रथम गुंतवणूकदार सौरव दत्ता यांनी एक्स (पूर्वी ट्विटर) वर शेअर केली. ही पोस्ट पाहून लोकांनी 'सोशल मीडिया'वर कमेंट्सचा पाऊस पाडला. काहींनी याला 'जनरेशनल वेल्थ' म्हटले, तर काहींनी याला 'लीगसी क्रिएशन' म्हटले. अनेक यूजर्सनी, 'कोणी ९० च्या दशकात १ लाख रुपये गुंतवू शकले असतील तर ते कुटुंब आधीच श्रीमंत होते,असेही लिहिले आहे . एक यूजर लिहितो, आता ती व्यक्ती आरामात निवृत्त होऊ शकते आणि जीवनाचा आनंद घेऊ शकते.

त्याची इच्छा असेल तर तो व्यवसाय देखील सुरू करू शकतो. दुसऱ्या यूजरने म्हटले, स्टॉक स्प्लिट्स, बोनस आणि डिव्हिडंडची ही खरी जादू आहे. ती कालांतराने अब्जावधींमध्ये बदलते. एकाने, कंपनीची मूलभूत तत्त्वे मजबूत असतील तर विक्रीची घाई करू नका, असा सल्लाही दिला आहे.

# सर्वात छोटा इंजिनिअर



इंजिनिअरींगची पदवी मिळवणं हे सोपं काम नाही. बरीच मेहनत करून प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर इंजिनिअरींगला प्रवेश मिळतो. ती जाडजूड पुस्तकं वाचता वाचता, कठीण प्रोजेक्ट्स पूर्ण करता करता नाकी नऊ येतात. बारावीनंतर इंजिनिअरींगला प्रवेश घेता येतो. पण बेल्जियमच्या अवघ्या नऊ वर्षांच्या लॉरेन्स सिमन्सने इंजिनिअरींगला प्रवेश घेतला आहे. तो जगातला इंजिनिअरींचा सर्वात लहान वयाचा विद्यार्थी असल्याचं बोललं जात आहे. त्याला डिसेंबरमध्ये इंजिनिअरींगची पदवी मिळेल. तो लॉरेन्स इंडोवन युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीमधून शिक्षण घेत आहे. लॉरेन्सचा आयक्यू १४५ आहे. त्यामुळे शिक्षकांनी शिकवलेलं त्याच्या डोक्यात अगदी सहज शिरतं. लॉरेन्सच्या हुशारीबद्दल आपल्याला सासू-सासर्यां कडून कळल्याचं त्याची आई लेडिया सांगते. वयाची दहा वर्षं पूर्ण होण्याआधीच इंजिनिअरींगची पदवी मिळवणार्यात लॉरेन्सचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. लॉरेन्सची बुद्धिमत्ता हा निसर्गाचा एक चमत्कारच म्हटला पाहिजे.

# दगड नव्हे मासा...

या पृथ्वीतलावर विषारी सजीवांची सं'या बरीच जास्त आहे. साप, विंचू असे सजीव खूप धोकादायक असतात. त्यांचं विष शरीरात भिनत जातं. या प्राण्यांच्या विषावर उतारा आहे. पण जगातला अत्यंत विषारी मासा माणसाचा जीव घेऊ शकतो. हा मासा 'स्टोन फिश' या नावाने ओळखला जातो. हा मासा दगडासारखा दिसत असल्यामुळे पटकन कोणाच्याही लक्षात येत नाही. या माशावर कोणाचा पाय पडला तर शरीरातून मोठ्या प्रमाणावर विष बाहेर पडतं. या विषावर पाय पडल्यास पाय कापण्यावाचून दुसरा पर्याय उरत नाही. थोड्याशा दुर्लक्षामुळे माणसाचा जीवही जाऊ शकतो. स्टोन फिशवर पाय पडल्यावर अवघ्या ०.५ सेकंदांमध्ये त्याच्या शरीरातून विष बाहेर पडतं. म्हणजे डोळ्यांची उघडझाप व्हायच्या आतच हा मासा विष बाहेर टाकतो. सर्वसाधारणपणे माशाची ठराविक रचना असते. त्याला कल्ले असतात. पण हा मासा दगडासारखा दिसतो. हा मासा आहे यावर कोणाचाही पटकन विश्वा्स बसणार नाही. हा मासा खूपच भयानक दिसतो. या स्टोन फिशपासून सांभाळून रहायला हवं.



# राजीनाम्याचं अनोखं कारण!



आजकाल 'सोशल मीडिया'वर एक अनोखे राजीनामा पत्र वेगाने व्हायरल होत आहे. सहसा लोक नोकरी सोडण्यासाठी वेगवेगळी कारणे सांगतात. काहींना आरोग्य समस्या असतात. काहींना कौटुंबिक कारणे असतात, तर काही करिअर बदलण्याचे कारण देतात. पण एका व्यक्तीने दिलेल्या कारणामुळे संपूर्ण इंटरनेटवर हास्याचे वादळ उठले आहे. ऑफिसमध्ये न येण्याचे कारण इतके अनोखे आहे की असे कारण 'एचआर'च्या स्वप्नातही येणार नाही!

एका व्यक्तीने त्याच्या बॉसला राजीनामा पत्र लिहिले आहे. पण हे पत्र सामान्य नाही. या व्यक्तीने राजीनामा पत्रात लिहिले आहे, 'साहेब, मी उद्यापासून ऑफिसला येणार नाही. कारण माझ्या शेतजमिनीतून हायवे बांधला गेला आहे'. या 'ईमेल'ने सोशल मीडियावर खूप हास्य निर्माण केले. त्यावर अनेक मजेदार कॉमेंट्सही आल्या आहेत. एका युजरने लिहीले, 'भावाने आयुष्यात एक मोठा निर्णय घेतला आहे, नोकरी सोडून व्यापारी होण्याची वेळ आली आहे. दुसरा युजर म्हणतो, हायवे बांधला गेला नाही, तर नशिबाचा एक्सप्रेसवे उघडला आहे. आणखी एक युजर लिहीतो, भावाचे नशिब उघडले आहे.




लोक या पत्राला 'रेजिग्रेशन ऑफ इयर' म्हणत आहेत. खरे तर या बातमीत दुःख आणि आनंद दोन्ही लपलेले आहेत. कारण हायवे म्हणजे सरकारने त्यांची जमीन घेतली आहे. पण त्यांना आता भरपाई म्हणून भरपूर पैसे मिळतील. याशिवाय उर्वरित जमीन हायवेच्या कडेला येणार आहे. त्यामुळे जमिनीचे भाव चांगलेच वाढतील. म्हणजेच आता ऑफिसला जाण्याची गरज नाही. ही पोस्ट व्हायरल झाल्यापासून, ती एक कोटींहून अधिक लोकांनी पाहिली आहे, तर अनेकांनी ती पोस्ट लाईक केली आहे.

# नाफेड मार्फत होणारी कांदा खरेदी रद्द करा

नगर – महाराष्ट्रात नाफेड व एन सी सी एफ मार्फत होणारी कांदा खरेदी शेतकऱ्यांच्या हितासाठी नसून, घोटाळा करणाऱ्या काही सोकावलेल्या बोक्यांसाठी आहे. गुपचूप सुरू केलेली कांदा खरेदी तातडीने बंद करावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालय, नाफेड आणि एन सी सी एफ चे चेअरमन व कार्यकारी संचालकांना केली आहे.

महाराष्ट्रात नाफेड व एन सी सी एफ मार्फत कांदा खरेदी सुरू करण्यात आली असल्याचे समजते. सदरची खरेदी मुल्य स्थिरीकरण निधी योजने अंतर्गत होणार आहे. राज्यातून सुमारे तीन लाख टन कांदा खरेदी केला जाणार आहे. अशा प्रकारे कांदा खरेदी सुरू करताना त्या बाबतची माहिती सार्वजनिक केली जाते. कोणत्या एजन्सीला किती कांदा खरेदी करायचा आहे, कोणत्या ठिकाणी खरेदी होणार आहे, खरेदीचा दर काय असणार आहे या सर्व बाबी आगोदर जाहीर केल्या जातात. परंतु या वेळेस माहिती सार्वजनिक केलेली नाही. कांदा खरेदी करणाऱ्या एजन्सीची नावे जाहीर केली जात नाही. एकूण नाफेडच्या कारभारा बाबत प्रचंड गोपनीयता पाळली जात आहे.

नाफेड व एन सी सी एफ द्वारे होणाऱ्या कांदा खरेदीत मोठा भ्रष्टाचार होत असतो या बाबत स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटना नेहमीच आवाज उठवत आली आहे. इतर राज्यात पाठवलेल्या कांद्याची बोगस डिलिव्हरी झाली आहे. त्या बाबत पाठपुरावा सुरू आहे. गोवा मार्केटिंग फेडरेशनचे एक अधिकारी त्यात निलंबित झाले आहेत. इतर राज्यात पाठवलेल्या कांद्यात असाच घोटाळा झाला आहे मात्र त्याची चौकशी करण्याचे टाळले जात आहे. अनेक ठिकाणी उन्हाळ कांद्या ऐवजी स्वस्तातला लाल कांदा पाठवला गेला आहे. या घोटाळ्यात नाफेडचे अधिकारी आकंठ बुडालेले आहेत. राजकीय नेते त्यांना पाठीशी घालत आहेत.

एक वर्षापूर्वी नाफेडचे चेअरमन यांनी नाशिक येथील कांदा खरेदी केंद्रांना अचानक भेट दिली असता त्यांना अनेक आक्षेपार्ह गोष्टी दिसून आल्या होत्या. यात बदल करून कांदा उत्पादकांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा नाफेड प्रयत्न करेल असे चेअरमन म्हणाले होते मात्र त्या नंतर झालेल्या खरेदीत व डिलिव्हरी देण्यात अधिक प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे स्पष्ट झाले आहे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले आहे.

या वर्षी कांदा खरेदीस बराच विलंब झाला आहे. साधारण मार्च मध्ये कांद्याची काढणी झाल्या नंतर एप्रिल मध्ये कांद्याची सरकारी खरेदी सुरू होत असते. या वर्षी मात्र २० जून उजाडला आहे. अनेक लहान शेतकऱ्यांनी आपला कांदा विकून टाकला आहे. सध्या कांद्याचे दर सरासरी वीस रुपयाच्या आसपास असताना सरकारने १४.३५ रु. किलो चे खरेदी दर जाहीर केले होते. सुधारित दर १६ रु. प्रति किलो पेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.

ज्या प्रतीचा कांदा नाफेड मार्फत खरेदी केला जातो ते एक नंबरचा कांदा असतो जो निर्यात दर्जाचा असतो त्याचे दर आज २५ रु. प्रति किलोच्या आसपास आहेत. यात शेतकऱ्यांचा फायदा कसा असू शकतो. शेतकऱ्यांचे असे ही म्हणणे आहे की नाफेडने जरी शेतकरी उत्पादक कंपन्या ऐवजी सहकारी संस्थांकडून कांदा खरेदी करण्याचे निश्चित केले असले तरी तीच मंडळी सहकारी संस्थांमार्फत कांदा खरेदी करणार आहेत. मंदीच्या काळात स्वस्तात खरेदी केलेला कांदा चढ्या भावात नाफेड व एन सी सी एफ ला देण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

नाफेड व एन सी सी एफ मार्फत होणारी खरेदी ना शेतकऱ्यांच्या हिताची आहे ना ग्राहकाच्या. यात फक्त कांदा खरेदी करणाऱ्या संस्था, नाफेड – एन सी सी एफ चे अधिकारी व पुढारी पैसे कमवत आहेत. आता कमी दरात खरेदी केलेला कांदा, तेजीच्या काळात पुन्हा बाजारात ओतून कांद्याचे भाव पाडण्याचा सरकारचा कार्यक्रम असतो. या वर्षी कांदा खरेदीचे दर बाजार भावा पेक्षा कमी आहेत. त्यामुळे खुल्या बाजारातील दर कमी होण्याची शक्यता आहे.

नाफेड कांदा खरेदी करणार आहे म्हणून नेहमीच्या सारवलेल्या एजन्सीज ने अगोदरच स्वस्तात कांदा साठवून ठेवला आहे. ८–१० रुपये किलोने खरेदी केलेला कांदा आता नाफेडच्या वाढीव दराने सरकारच्या गळ्यात मारून ही मंडळी कोट्यवधी रुपये कमावणार आहेत. हा गैर प्रकार कायमचा बंद व्हावा व तेजीच्या काळात कांद्याचे भाव पडण्यासाठी हा स्टॉक वापरला जाऊ नये यासाठी सरकारने कांदा खरेदी रद्द करावी अशी मागणी अनिल घनवट यांनी केंद्र शासनाकडे केली आहे.

यापूर्वीच्या खरेदीत पाच हजार कोटींचा घोटाळा झाला असल्याचा आरोप करत विश्वास माधवराव मोरे यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. स्वतंत्र भारत पक्ष त्यांच्या बरोबर राहणार असून कांदा खरेदी सुरू झाल्यास, खरेदीवर लक्ष ठेवण्यासाठी समित्या नेमण्यात येणार आहेत अशी माहिती घनवट यांनी दिली आहे.

## राष्ट्रीय संघर्ष समिती (ईपीएस ९५) च्या शहर कार्याध्यक्षपदी बाळासाहेब देशमुख



नगर – राष्ट्रीय संघर्ष समिती (ईपीएस ९५) अहिल्यानगर शहर कार्याध्यक्षपदी ज्येष्ठ कार्यकर्ते त्रिंबकराव उर्फ बाळासाहेब देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. शहरात झालेल्या राष्ट्रीय संघर्ष समितीच्या बैठकीत त्यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली.

देशातील विविध खाजगी व शासकीय औद्योगिक क्षेत्रातील सुमारे ७८ लाख पेन्शन धारकांच्या पेन्शन वाढीसाठी गेले आठ ते नऊ वर्षापासून देशभरात संघटना कार्यरत आहे. शहरात झालेल्या बैठकीत देशमुख यांच्या नावाची सूचना संघटनेचे पश्चिम भारत संघटक सुभाषराव पोखरकर यांनी मांडली. त्यास अमित घाडगे महाराष्ट्राचे प्रांतीक संघटक यांनी अनुमोदन दिले. सभेच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष आप्पासाहेब वाळके होते. याप्रसंगी दिलीप कहाने, राजगुरु, संपतराव समिंदर, आशाताई शिंदे, प्रकाश गायके, भिमराव भिसे, डॉ. गाडेकर, प्रकाश मुरुमकर, शिवाजी थोरात, महादेव शिंदे, बबनराव खामकर आदी उपस्थित होते.

पेन्शनवाढची मागणी मान्य होण्यासाठी सर्व पेन्शनर्सनी एकजुट व्हावे. शहरातील जास्तीत जास्त पेन्शनर्स यांनी संघटनेचे सभासद होऊन संघटना बळकट करण्यासाठी काम करण्याचे आवाहन नवनियुक्त शहर कार्याध्यक्ष बाळासाहेब देशमुख यांनी केले. संघटनेचा शपथ ग्रहण कार्यक्रमाने सभेची सांगता झाली.

## महिलांसाठी २७ जून रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबीर

नगर – निमगाव वाघा (ता. नगर) येथे आषाढी एकादशी आणि राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २७ जून रोजी सकाळी ९ वाजता गावातील संत शिरोमणी सावता महाराज मंदिराच्या सभामंडपात या शिबिराला सुरुवात होणार आहे.

या उपक्रमाचे आयोजन जयश्री नर्सिंग होम (भागीरथी हॉस्पिटल), स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ तसेच धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या शिबिरात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. जयश्री रौराळे या महिलांची वैद्यकीय तपासणी करणार असून, त्यांना विविध आरोग्य विषयक मार्गदर्शन देखील करणार आहे. महिलांच्या विविध आजारांबाबत योग्य निदान, उपचार पद्धती, नियमित तपासणी, आहार व व्यायाम यावर डॉ. रौराळे सविस्तर माहिती देतील.

या शिबिराचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी केले आहे. शिबिर पूर्णतः मोफत असून नाव नोंदणी अनिवार्य आहे. इच्छुक महिलांनी डॉ. जयश्री रौराळे ९६०७५ २८५२८ व पै. नाना डोंगरे ८६०५७ ७५२६१ यांच्याशी संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.



## पोलीस पुत्र व आजीचे मुंबई येथील आझाद मैदानात आमरण उपोषण सुरू

जिल्हा पोलिस दलात अनुकंपा तत्वावर नातवाला हजर करून घेण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या निषेधार्थ ८२ वर्षीय आजीने नातवासमवेत मुंबईतील आझाद मैदानात २३ जून पासून आमरण उपोषण सुरु केले आहे. सुलोचना गणपत केदारे व विक्रम विठ्ठल केदारे (रा. वाल्मिकी नगर, नगर पाथडी रोड, भिंगार) असे उपोषणास बसलेल्यांची नावे आहेत.

# अपंग, घटस्फोटीत व खोट्या परितक्त्या यांची कोणती तपासणी न करता दाखल्यांवर संवर्ग एक मधून बदली प्रक्रियेमध्ये समाविष्ट केल्याचा आरोप

### बेरोबाबदार पडताळणी समिती, शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण

नगर – जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग मध्ये सन २०२५ च्या जिल्हा अंतर्गत शिक्षक बदलीतील संवर्ग १ मध्ये बदली प्रक्रियेमध्ये जिल्हा शिक्षणाधिकारी व तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा गैरवापर करून खोटे अपंग, खोट्या घटस्फोटीत व खोट्या परितक्त्याची कोणतीही तपासणी न करता फक्त खोट्या दाखल्यावर त्यांना संवर्ग एक मधून बदली प्रक्रियेमध्ये समाविष्ट केल्या असल्याच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांचे जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण सुरू करण्यात आले. यावेळी विजय शिरसाठ, स्वप्निल साठे, विशाल भिंगारदिवे, ॲड. अशोक पालवे, अजय बडोदे, ऋषिकेश खुडे, ॲड. रामदास आडगले, रवी गव्हाणे, योगेश भालेराव, दत्ता, तुकाराम कोटकर, रोहित आढाव, गौरव नरवडे, अल्हाट सर, संदीप वाकचौरे, अमोल इंगळे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांनी जिल्हा परिषदेच्या आवारात आमरण उपोषण सुरू केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संवर्ग १ मधून अर्ज केलेले सर्व अपंग शिक्षक, शिक्षिका, त्यांचे पाल्य, माता–पिता यांची जे. जे. रुग्णालय मुंबई येथे इन कॅमेरा शारीरिक तपासणी करावी व दोषींवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे तसेच घटस्फोटीत शिक्षिका यांचे प्रमाणपत्र जुने पूर्वीचे असून काहींनी पुनर्विवाह केले आहेत त्यांची नव्याने संतती ही आहे. म्हणून त्यांची आजची वैवाहिक स्थिती व त्यांची घटस्फोटानंतर आजची आपत्य स्थिती याबाबत सखोल चौकशी पोलीस यंत्रणेमार्फत करावी व खोट्या घटस्फोटीत यांवर तात्काळ फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना बडतर्फ करण्यात यावे. तसेच परितक्त्या शिक्षिका यांनी खोटी माहिती देऊन खोटे दाखले मिळवलेले आहे. परितक्त्या होऊन वर्षाच्या वर कालावधी उलटूनही या महिलांनी न्यायालय, पोलीस व दिलासा सेलमध्ये साधी तक्रार करून नोंदणी ही केलेली नाही. पतीशी सगंमत करून खोटी नोटरी केली आहे या सर्व परितक्त्या शिक्षकेची पोलीस यंत्रणे कडून घरी जाऊन चौकशी करून खोट्या परितक्त्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे व त्यांना देखील सेवेतून बडतर्फ करण्यात यावे तसेच खोटे अपंग खोट्या घटस्फोटीत व खोट्या परितक्त्यांची कोणतीही तपासणी न करता पडताळणी समितीने त्यांचे बदली अर्ज मान्य केले आहे या बेजबाबदार पडताळणी समितीवर व बेजबाबदार शिक्षणाधिकारी व तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी यांच्यावर कर्तव्यात कसूर करणे शिस्तभंग करणे अधिकाराचा गैरवापर करणे याबाबत कठोर कारवाई होऊन फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## चित्रकार नुरील भोसले यांना राष्ट्रीय पुरस्कार



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील चित्रकार नुरील प्रभात भोसले यांना सहावे ऑल इंडिया कला स्पर्धा प्रदर्शनात तृतीय क्रमांकाचे राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. युवा विकास पर्यटन व संस्कृती विभाग तेलंगणा सरकारच्यावतीने या कला स्पर्धा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हैदराबाद येथील स्टेट गॅलरी ऑफ आर्ट येथे कला स्पर्धा प्रदर्शन पार पडले. यामध्ये भारतभरातून एकूण २ हजार कलाकारांच्या कलाकृतींनी सहभाग घेतला होता. त्यापैकी १५० कलाकृती प्रदर्शनासाठी निवडण्यात आल्या. त्यातून तृतीय क्रमांकाचे पारितोषिक राहुरी तालुक्यातील चित्रकार नुरील भोसले यांच्या अरुंधती या व्यक्तीची चित्रास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. हे चित्र कागदावरती जलरंग या माध्यमातून रंगविले असून, त्याचा आकार २४ बाय ३२ इंच आहे.

पर्यटन, संस्कृती व हेरिटेज विभाग (तेलंगणा सरकार) विशेष सचिव जयेश रंजन यांच्या हस्ते भोसले यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. भोसले यांना यापूर्वी देखील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पारितोषिक प्राप्त झाले आहेत.



अहिल्यानगर तालुका तहसीलदार तथा तालुका व महसूल प्रशासनाच्या गलथान कारभाराच्या विरोधात सत्याग्रह करून हल्लाबोल आंदोलन आले.

## तहसील कार्यालयावर हल्लाबोल सत्याग्रह आंदोलन सुरू

नगर – अहिल्यानगर तालुका तहसीलदार तथा तालुका व महसूल प्रशासनाच्या गलथान कारभाराच्या विरोधात सत्याग्रह आंदोलन सुरू असुन अहिल्यानगर जिल्ह्यातील मौजे चिचोंडी पाटील या गावातील सरोदे कुटुंबीय व सरपंच शरद पवार हे ९ दिवसापासून तहसील कार्यालयाच्या आवारात घर संसार घेऊन उपोषणासाठी बसले आहे. या चिचोंडी पाटील गावातील सरोदे कुटुंबीयांची चोरी गेलेली जमीन परत मिळवण्यासाठी उपोषण सुरू आहे. मात्र ९ दिवस उलटून गेले तरी यांना न्याय मिळत नाही त्यामुळे नाईलाजाने आज सरपंच शरद पवार व सरोदे कुटुंबीय सोबतच सर्व पंचक्रोशीतील अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांच्या वतीने तहसील कार्यालयावर हल्लाबोल सत्याग्रह आंदोलन महसूल प्रशासनाच्या गलथान कारभारा विरोधात हल्लाबोल सत्याग्रह आंदोलन करण्यात आले. यावेळी सरपंच शरद पवार, प्रकाश पोटे, अरुण रोडे, नितीन पाटील लिगडे आदिसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ व अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिक उपस्थित होते.

त्यानंतर आंदोलन करता शिष्टमंडळाने तहसीलदार यांची भेट घेऊन आश्वासन दिले त्यानंतर आंदोलन स्थगिती करून आंदोलन करते उपोषणाला बसले आहे.

## बालरंगभूमी परिषद, नगरतर्फे नाट्यानंद कार्यशाळेचे आयोजन

नगर – येथील बालरंगभूमी परिषद, अहिल्यानगर शाखा आयोजित नाट्यानंद ही सृजन कार्यशाळा ८ ते १६ वय वर्ष मुला मुलींसाठी जुलै पासून प्रत्येक शनिवारी व रविवारी घेण्यात येणार आहे. यात बालनाट्य, रंगमंच, अभिनय, माईम, नाट्यछटा, एकपात्री चित्रकला, नृत्य, कथाकथन, वक्तृत्व, कल्पनाशक्ती, आत्मविश्वास आणि संवाद कौशल्ये व नाटयशास्त्रचा इतिहास या विषयी कला क्षेत्रातील दिग्गज संपूर्ण वर्षभर मुलांना प्रशिक्षित करणार अशी माहिती अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष प्रसाद भणगे यांनी दिली.

कार्यशाळेतून व्यावसायिक बालनाट्याची निर्मिती होणार असून, कार्यशाळेतील विद्यार्थ्यांच्या बालनाट्याचे प्रयोग रसिकांना बघायला मिळणार आहेत. या बालनाट्ये विविध ठिकाणी सादर करण्यात येणार आहे. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सतीश लोटके, अनंत जोशी, उर्मिला लोटके, शैलेश देशमुख, सुजाता पायमोडे, सागर अलचेट्टी, ऋतुजा पाठक, सोनाली दरेकर, टीना इंगळे, श्रीया देशमुख, सपना साळुंके, प्रशांत सूर्यवंशी, विराज अडगटला, अविनाश बोधले, तेजस अतितकर आदी कार्यशील आहेत.

कार्यशाळेच्या प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी प्रसाद भणगे ९२५३१६६१५, देवीप्रसाद सोहोनी ९५०३९५१००२, सौ. तेजा पाठक ९४२०७४९४९७ यांना संपर्क करावा असे आवाहन बालरंगभूमी परिषदेच्या वतीने करण्यात आले.

## श्री मुक्ताई पायी दिंडी सोहळ्याचे २६ जूनला माळीवाडा येथे आगमन

नगर – वारकरी परंपरेचा अखंड ठेवा जपणारा आणि भक्तिमय वातावरणात दरवर्षी पार पडणारा मुक्ताई पायी दिंडी सोहळा यंदाही उत्साहात पार पडणार आहे. २६ जून रोजी सायंकाळी ५ वाजता या सोहळ्याचे आगमन शहरातील माळीवाडा वेस येथील महात्मा फुले पुतळा परिसरात होणार आहे.

दरवर्षी प्रमाणे या सोहळ्याचे आयोजन अत्यंत श्रद्धा, भक्ती व पारंपरिक पद्धतीने करण्यात आले असून, जिल्ह्यातील व शहरातील विविध भागातून वारकरी, भाविक, महिला–पुरुष, तरुण–तरुणी या पायी दिंडीत सहभागी होत आहेत. टाळ–मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा–तुकारामच्या जयघोषात ही पायी दिंडी नगरमध्ये प्रवेश करणार असून, ठिकठिकाणी दिंडीचे स्वागत करण्यासाठी नागरिकांनी उत्साहात तयारी सुरू केली आहे. दिंडीचे नगरमध्ये आगमन झाल्यानंतर महात्मा फुले पुतळा परिसरात भाविकांसाठी दर्शन व्यवस्था तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा व भक्तिभावाने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री मुक्ताई पायी दिंडी सोहळा समितीतर्फे करण्यात आले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीसाठी ठाकरे शिवसेना ताकदीने मैदानात उतरणार

### महाविकास आघाडीच्या जागांवाटपाबाबत लवकरच बैठक : जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे



शिवसेना ठाकरे गटाच्या आयोजित बैठकीत बोलताना जिल्हा प्रमुख प्रा.शशिकांत गाडे.

नगर – आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती व महापालिका निवडणुकीसाठी पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी तयारीला लागण्याचे आदेश दिले असुन शिवसेना पुर्ण ताकदीने या निवडणुकीत उतरणार आहे. महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबत लवकरच खा. निलेश लंके यांच्यासोबत बैठक घेतली जाईल अशी माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा.शशिकांत गाडे यांनी दिली.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीबाबत चर्चा करण्यासाठी २४ जून रोजी नगर शहरात शिवसेना ठाकरे गटाची बैठक प्रा. गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीस अहिल्यानगर शहर, नगर तालुका, पारनेर तालुका व श्रीगोंदा तालुक्यातील शिवसेनेचे महत्त्वाचे पदाधिकारी उपस्थीत होते.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणारे आणि महाराष्ट्र धर्मासाठी सज्ज असलेले शिवसैनिक निवडणुकांमध्ये पूर्ण ताकदीने उतरण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला. या प्रसंगी प्रा. शशिकांत गाडे यांनी सांगितले की, शिवसेनेचे ज्या गटात, गणात व प्रभागात विद्यमान सदस्य व नगरसेवक आहेत, त्या जागा शिवसेनेकडेच राहतील.

इच्छुक उमेदवारांनी आता निवडणुकीसाठी सज्ज व्हावे. सामान्य जनता उद्धव ठाकरे आणि शिवसेनेच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. सकारात्मक विचार ठेवा आणि जिद्द सोडू नका. नगर तालुक्यात पुन्हा शिवसेनेचा भगवा फडकणार आहे. तसेच खा. निलेश लंके यांच्यासमवेत बैठकीचे आयोजन करून आगामी निवडणुकांसाठी महाविकास आघाडीतील जागावाटप निश्चित करणार असल्याचे संकेत प्रा.गाडे यांनी बैठकीत दिले. शिवसेना आता नव्या जोमाने जनतेसमोर जात असून स्थानिक पातळीवरील प्रश्न, विकासकामे, शेतकरी, तरुण, महिला आणि सामान्य जनतेच्या हितासाठी समर्पित भावनेने काम करणार आहे.

या बैठकीस युवा सेनेचे सहसचिव विक्रम राठोड, उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, योगीराज गाडे, नगर तालुका प्रमुख राजेंद्र भगत, डॉ. भास्कर शिरोळे, पारनेर तालुका प्रमुख डॉ. श्रीकांत पठारे, उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब दुतारे, रविंद्र वाकळे, पारनेर शहर प्रमुख निलेश खोडदे, युवासेना नगर प्रमुख प्रवीण गोरे, पारनेर युवासेना प्रमुख अनिल मोटे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख गणेश कुलट, संदीप गुंड, प्रवीण कोकाटे आणि डॉ. राम कदम, पोपटराव निमसे, किरण वामन, रा. वि. शिंदे, सोमनाथ कांडके, गणेश गुंड, दिलीप शिंदे, रामेश्वर सोलट, बाबासाहेब ससे, अरुण ससे, डॉ. ससे, बाबा देशमुख आदि पदाधिकारी उपस्थित होते.



वारूळवाडी येथे गणेशवाडी येथील दिंडीचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीचे माजी अध्यक्ष सुभाष कराळे, विद्या कराळे, कमल घुले, दिपाली कर्डिले, सुनिता कराळे, योगिता कराळे, किरण लोहकरे, हभप बाबुराव महाराज लोहकरे, गोपीनाथ कुऱ्हे, आनंद कराळे आदी (छाया– विजय मते)

# गणेशवाडी पायी दिंडीचे वारूळवाडी येथे स्वागत

नगर – श्रीक्षेत्र गणेश वाडी ते श्रीक्षेत्र पंढरपूर या पायी दिंडीचे वारूळवाडी येथे जिल्हा परिषद कर्मचारी क्रेडिट सोसायटीचे माजी अध्यक्ष सुभाष कराळे यांनी स्वागत करून वारकऱ्यांना दुपारचे भोजन दिले.

नेवासा तालुक्यातील ही दिंडी गेल्या १८ वर्षापासून वारुळवाडी येथील कराळे मळ्यात दुपारी भोजनासाठी येत असते हभप बाबुराव महाराज लोहकरे यांच्या मार्गदर्शनाने हभप मच्छिंद्र महाराज भोगे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही दिंडी पंढरपूरला जात असते.

मंगळवार दुपारी या दिंडीचे कराळे मळ्यात स्वागत करण्यात आले. सुभाष कराळे यांच्या वतीने वारकऱ्यांना भोजन देण्यात आले. यावेळी विद्या कराळे, कमल घुले, दिपाली कर्डिले, सुनिता कराळे, योगिता कराळे, किरण लोहकरे, गोपीनाथ कुऱ्हे आनंद कराळे आदींच भाविक उपस्थित होते.

